

महाविद्यालय विकास समिती बैठकप्रसंगी रयत शिक्षण संस्थे सन्माननीय सचिव डॉ. व्ही. एस्. शिवणकर सोबत मा. प्राचार्य डॉ. बी.टी. जाधव मा. द. श्री. जाधव, मा. प्रकाश चव्हाण व मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे



रयत शिक्षण संस्थेच्या सहसचिव, मा. प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड मॅडम यांची महाविद्यालयास सदिच्छा भेट, त्याप्रसंगी मॅडमचे स्वागत करताना मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे



महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. ॲड. रविंद्र पवार (भाऊ)यांचे स्वागत करत मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे, मा. श्री. अनिल पोतदार



''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''-कर्मवीर

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता. कराड, जि. सातारा-४१५ १०९

## संपादक समिती

### अध्यक्ष
प्राचार्य डॉ. संजय कांबळे

### प्रमुख संपादक
प्रा. डॉ. वदंना मोहिते

### विभागीय संपादक
प्रा. डॉ. उमाप आबासाहेब (मराठी)
प्रा. सोमनाथ कोळी (हिंदी)
प्रा. फासे निलेश (इंग्रजी)
प्रा. मडावी आशा (सामाजिक शास्त्रे)
प्रा. पाटील कल्पना (फोटो विभाग)
प्रा. कोरडे शोभा (अहवाल विभाग)

### विशेष सहाय्य
श्री. भरत पवार
श्रीमती निता मोहिते

### मुद्रक
निर्मल अक्षरनिर्मिती प्रिंटींग प्रेस
पोवई नाका, सातारा.

### अक्षर संधान
निर्मल अक्षरनिर्मिती प्रिंटींग प्रेस
पोवई नाका, सातारा.

### मांडणी
प्रा. डॉ. वंदना मोहिते

### मुखपृष्ठ
निर्मल अक्षरनिर्मिती प्रिंटींग प्रेस



"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"-कर्मवीर

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता. कराड, जि. सातारा-४१५ १०९

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- विद्यापीठापेक्षा महाविद्यालयाचा निकाल अधिक
- विद्यार्थिनींच्या बौध्दिक व व्यक्तिमत्व विकासाचे अनेक उपक्रम
- मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व समाजशास्त्र इ. स्पेशल विषयांची सोय
- विविध शॉर्ट टर्म कोर्सेस
- अद्ययावत संगणक प्रयोगशाळा
- कर्मवीर विद्याप्रबोधिनी
- स्पर्धा परीक्षा केंद्र
- इंग्लिश स्पिकींग कोर्स
- सुसज्ज महिला वसतिगृह
- ज्युडो कराटे प्रशिक्षण
- ह्युमन राईटस् एज्युकेशन फाऊंडेशन कोर्स
- फॅशन डिझाईनिंग कोर्स
- ब्युटी अँण्ड वेलनेस कोर्स
- भरतीपूर्व पोलिस प्रशिक्षण केंद्र
- नेव्ही/एअर फोर्स भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र
- स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी स्वतंत्र अभ्यासिका
- सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे विद्यार्थिनींच्या कला गुणांना वाव
- भित्तीपत्रकाद्वारे विद्यार्थिनींच्या साहित्य गुणांना वाव
- क्रीडा विभागामार्फत अनेक खेळांचे प्रशिक्षण

## त्रिवेणी

दि प्रेस अँण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियमन फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती-

प्रकाशन स्थळ :
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

प्रकाशन काळ : वार्षिक

प्रकाशक : प्राचार्य डॉ. संजय कांबळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,
उंब्रज ता. कराड, जि. सातारा. ४१५ १०९.
दूरध्वनी : (०२१६४) २६४२३५
ई-मेल : yssmmuks@yahoo.co.in

संपादक : प्रा.डॉ. वंदना मोहिते
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,
उंब्रज ता. कराड, जि. सातारा. ४१५ १०९.

मुद्रक : श्री. स्वप्निल जाधव
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : गाळा नं. ३,४,७,८ प्रेस्टीज चेंबर पोवई नाका, सातारा.

संगणक : श्री. स्वप्निल जाधव
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : गाळा नं. ३,४,७,८ प्रेस्टीज चेंबर पोवई नाका, सातारा.

मालकी : रयत शिक्षण संस्थेचे,
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज
ता. कराड, जि. सातारा.

प्राचार्य : डॉ. संजय कांबळे

या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेली मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्या मताशी सहमत असेलच असे नाही.

# आमचे दैवत



संस्थापक
रयत शिक्षण संस्था, सातारा
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील



रयत माऊली
सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील

# प्रेरणा



**मा.खासदार डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब**
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा.



**मा. डॉ. अनिल पाटील**
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा.



**मा. प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर**
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.



**मा. प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड**
सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.



**मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.

त्रिवेणी २०२०-२१
रयत शिक्षण संस्थेचे,
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज



**प्राचार्य, डॉ. संजय कांबळे**

## महाविद्यालय विकास समिती



डॉ. अनिल पाटील
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



श्री. ॲड. रविन्द्र पवार
मॅनेजमेंट



प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव
स्थानिक, प्रतिनिधी (शिक्षण)



श्री. द. श्री. जाधव (आबा)
स्थानिक, प्रतिनिधी (उद्योजक)



श्री. रणजीत जगताप (आबा)
स्थानिक, प्रतिनिधी (समाजसेवा)



प्राचार्य, डॉ. संजय कांबळे
स्थानिक, प्रतिनिधी (कृषि)



प्रा. सुरेश साळुंखे
प्राचार्य नियुक्त



प्रा. मनोहर माळगे
समन्वयक, आय. क्यू. ए.सी.



प्रा. शिवानंद भंडारी
प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा. आशा महावी
प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा. कल्पना पाटील
प्राध्यापक प्रतिनिधी



श्रीमती विद्या भोसले
स्थानिक प्रतिनिधी (समाजसेवा)



श्री. भरत पवार
शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी



कायदा क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करताना मा. डॉ. चंद्रकांत कांबळे



दि. २६ जून २०२० रोजी, राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त ऑनलाईन मार्गदर्शन करताना मा. सुदर्शन इंगळे



सल्लागार समिती सभाप्रसंगी पत्रकार प्रविण कांबळे यांचे स्वागत करताना मा. प्रकाश चव्हाण (जनरल बॉडी सदस्य, र.शि.सं. सातारा) सोबत मान्यवर



अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर आणि सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रयत शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रमात ऑनलाईन मार्गदर्शन करताना मा. उत्तम कांबळे



# प्राचार्यांचे मनोगत

**शैक्षणिक** वर्ष २०२०-२१ मधील महाविद्यालयाचे त्रिवेणी नियतकालिक वाचकांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. पद्मभूषण तीर्थरूप डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी दि. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले ता. कराड जि. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. उंब्रज पंचक्रोशीतील विद्यार्थीनींना महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी संस्थेने शैक्षणिक वर्ष १९८९ पासून उंब्रज येथे महिला महाविद्यालयाची स्थापना केली. रयत शिक्षण संस्था व उंब्रज पंचक्रोशितील जनतेच्या सहकार्याने शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून वाणिज्य शाखेतील पदवी शिक्षणाची संधी विद्यार्थिनींना प्राप्त झालेली आहे. आजच्या जागतिक कोरोना महामारीच्या काळात विद्यार्थिनींना आत्मविश्वासाने आव्हानांना सामोरे जाता यावे यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने महाविद्यालयामध्ये अध्यापन केले जात आहे. याशिवाय शैक्षणिक गुणवत्ता वाढ प्रकल्प, कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत कौशल्यावर आधारित फॅशन डिझाइनिंग, ब्युटी अँन्ड वेलनेस, ऑफिस ऑटोमेशन, पाककला, प्राथमिक योगा, कराटे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, इत्यादी कोर्सेस सुरू आहेत. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे प्रभावी व्यक्तिमत्व घडावे म्हणून महाविघालयामध्ये क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथालय विभाग, प्लेसमेंट विभाग, समुपदेशन केंद्र, कमवा व शिका योजना, रयत आविष्कार, सांस्कृतिक विभाग इ. कार्यरत आहेत.

जीवन सकारात्मक, उत्साहपूर्ण, आनंदी व समाधानकारक जगण्यासाठी साहित्याचे अनन्य साधारण महत्त्व आहे. महाविद्यालयीन जीवनात आपले विचार, अनुभव व भावना लिखित स्वरूपात व्यक्त करता याव्यात म्हणून महाविद्यालयाच्या वतीने त्रिवेणी नियतकालिक प्रकाशित करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज करत असताना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील, सचिव मा. प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव, मा. प्रिं. डॉ. प्रतिभा गायकवाड, ऑडिटर मा. प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. अॅड. रवींद्र पवार, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. द. श्री. जाधव (आबा), मा. प्रिं. डॉ. बी. टी. जाधव, मा. डॉ. रणजीत जगताप, जनरल बॉडी सदस्य मा. प्रकाश चव्हाण इ. मान्यावरांचे मार्गदर्शन मिळाले. यावद्दल आम्ही सर्व मान्यवरांचे ऋणी आहोत. वाचक रसिक या अंकाचे सहर्ष स्वागत करतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.

प्राचार्य,
डॉ. संजय माधवराव कांबळे,
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज.



# संपादक

प्रा. डॉ. वंदना मोहिते

**सन** २०२०-२१ चे त्रिवेणी नियत कालिक वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. २०२०-२१ हे वर्ष यामध्ये विद्यार्थीनींचे शिक्षण-परीक्षा सगळेच ऑनलाईन झाले पण यातून सध्या आमच्या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. संजय कांवळे यांची प्रेरणा आणि उत्साह तसेच कमिटीचे सहकार्य यातून या अंकाची निर्मिती होत आहे.

साहित्य हे समाजाच्या हितासाठी असते जेणेकरून समाजामध्ये जागृकता निर्माण व्हावी, बदल निर्माण व्हावेत. अन्यायाविरूध्द लढा देण्याची प्रेरणा हे साहित्य करते असते. याबरोबरच साहित्य लेखनाची विद्यार्थीनींना आवड व्हावी या दृष्टिकोणातून हे नियतकालिक प्रकाशित गेले सात वर्ष झाले होत आहे. त्रिवेणीचे अंतरंग कोरोना परिस्थिती असून देखील विविध उपक्रमांनी बहरलेले दिसते आहे. याचे प्रतिबिंब फोटोंच्या माध्यमातून दिसून येते

आमच्या महाविद्यालयाचे प्रेरणास्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांवळे यांनी या कठीण प्रसंगी ... त्रिवेणी नियतकालिकास प्रेरणा दिली. तसेच विभागीय संपादक, इतर प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थीनी यांचेही या नियत कालिकास बहुमोल सहकार्य मिळाले. सातारा येथील निर्मल प्रिंटींग प्रेसचे मालक श्री. स्वप्निल जाधव व त्यांचे सर्व सहकारी यांचे मनापासून आभार.

प्रा. डॉ. वंदना मोहिते
संपादक





# मराठी विभाग

दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुखात गेले.

- नारायण सुर्वे

**विभागीय संपादक**

प्रा. डॉ. उमाप ए. एस.
प्रा. शैला माने

# अंतरंग

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १ कोरोना काळातील आर्थिक सामाजिक समस्या | संजीवनी शेजवळ | बी.ए. भाग-३ मराठी विभाग | ५ |
| २. स्त्रीवादी साहित्य समीक्षा | दुर्गा भिसे | बी.ए. भाग-३ मराठी विभाग | ७ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. कर्मवीरांना वंदन ! | कु. पुजा माने | बी.ए. भाग-३ मराठी विभाग | १० |
| २. मुलगी आहे म्हणून | कु. रेखा सकटे | बी.ए.भाग - १ | १० |
| ३. शेतकरी | कु. मृदुला धडाम | बी.ए.भाग - २ | ११ |
| ४. जीवन एक संघर्ष | कु. दुर्गा भिसे | | ११ |
| ५. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात | कु. सुनिता चव्हाण | बी.ए.भाग - १ | १२ |
| ६. प्रश्न | कु. रोहिणी जाधव | बी.ए. भाग-३ मराठी विभाग | १२ |
| ७. लक्ष्मीचं देणं | कु. राधा कुंभार | बी.ए. भाग-२ मराठी विभाग | १२ |










## कोरोना काळातील आर्थिक सामाजिक समस्या

(April - 2021)

संजीवनी सेजवळ- बी.ए.भाग-३

**करोनाचा** काळ हा अनपेक्षित व अचानक होता. आज एक वर्षाचा काळ उलटूनही अनिश्चितता हेलकावे घेतच आहे. ही अनिश्चितता सर्वच क्षेत्रात जाणवते. व्यवसाय, नोकरी, उदयोग, उत्पादकता, उत्पादन, अर्थव्यवस्था सगळेच अनिश्चित काळाकरता थंडावले. करोना संकट हे शतकातील सर्वात मोठे आव्हान ठरले. औषधाच्या शोधा अभावी अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. संपूर्ण जगाप्रमाणेच आपल्या देशालाही करोना साथीची झळ पोहचली. अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचा वेग मंदावला. कोविड-१९ अर्थात करोना विषाणूचा प्रसाराचा परिणाम भारतासह संपूर्ण जगातील प्रत्येक घटकावर अत्यंत खोलवर झाला आहे. आज 'करोना' या महासंकटाने जगातील एक मोठा भाग व्यापला आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. उदयोगधंदे ठप्प झाले. अनेकांचे रोजगार गेले. मालाचे उत्पादन आणि वितरण ही साखळीच पूर्णपणे विस्कळीत झाली आहे.

जेव्हा हे करोनाचे संकट चालू झाले तेव्हा फक्त चीनपुरते मर्यादित राहिल असे वाटत असतानाच या महामारीने डोके वर काढले व हातपाय पसरायला सुरुवात केली. मागील वर्षी डिसेंबर -जानेवारीत चीनच्या उहान प्रांतात पहिल्यांदा हा विषाणू आढळून आल्यानंतर अल्पकाळात हयाचा प्रभाव जगभर चालला आहे. तेल उत्पादक देश, रशिया व अमेरिका यांच्यात सुरु झालेल्या तेलयुद्धाचा अन्य देशांना फायदा होईल की नाही हा प्रश्न मात्र अदयाप अनुत्तरित आहे. या देशांतील व्यापार युद्धामुळे आणि एकूणच मंदीमुळे तेलाची मागणी मात्र कमी झाली. इंटरनेट व तंत्रज्ञानामुळे व्यावसायिकदृष्टया जग हे खुप छोटे झाले आहे. विकसित देशांना सेवा पुरविणाऱ्या आयटी कंपन्यांची जागतिक पातळीवरील देवघेव इतकी वाढली आहे की एका देशातील उदयोग बंद पडताच त्याचा दुसऱ्या देशाला लगेच फटका बसतो.

आपल्याकडील पर्यटन व वाहतूक क्षेत्र मंदीच्या सावटाखाली आहे, तीर्थक्षेत्रे, खाण्याच्या जागा, शॉपिंग,मॉल तसेच गर्दीच्या जागा ओस पडताना दिसत आहेत. कृषी क्षेत्रालाही मोठा फटका या करोनामुळे बसला आहे. कांदयाला मिळणारा भाव कमी होत असताना पालेभाज्या आणि फळांची मागणीही घटलीय. देशातून मासे आणि कोळंबीची मोठया प्रमाणात निर्यात होते. करोनासंदर्भात पसरलेल्या अफवांचा सर्वात मोठा फटका पोल्ट्री व्यवसायाला बसलाय. या व्यवसायाला दरमहा तब्बल ४०० कोटी रूपयांचा फटका सहन करावा लागतोच. चिकनचा भाव अगदी १० रू. प्रती किलो पर्यंत खाली आला होता यामुळे पोल्ट्रीशी संबंधित इतर पुरक उदयोगांवरही याचा परिणाम झाला. खादय निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी खरेदी थांबवल्यामुळे मका व सोयाबीन सारखी पिके घेणारे शेतकरीही अडचणीत आले. केवळ महाराष्ट्रात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या पोल्ट्री व्यवसायावर

अवलंबून असलेल्या सुमारे १० लाख लोकांना याची झळ सोसावी लागत आहे.

पर्यटन उदयोगावर झालेले परिणाम भयंकर आहेत पर्यटनामुळे विमानप्रवास, एअर होस्टेस, पायलट यांच काम, विमानतळावरचे कर्मचारी, हॉटेलमधील वास्तव्य, रेस्टॉरंट्स, टॉकीज हे सगळे उदयोग ठप्प झाले आहेत. करोनामुळे जगातील आणि देशातील ८०% ते ९०% प्रवास बंद झाला त्यामुळे कोटयावधी लोकांचा रोजगार गोठल्यासारखा झाला आहे. फिल्म व करमणूक उदयोग यांचेही तसंच काहीस झालं. अनेक चित्रपटांची निर्मिती प्रक्रियाही बंद झाली आहे. एक चित्रपट बनवताना त्यात केवळ निर्माता, दिग्दर्शक आणि कलाकारच नव्हे तर शेकडो लोक तांत्रिक व इतर कामे करण्यात गुंतलेली असतात. करोनाच्या काळात सार्वजनिक ठिकाणी जाऊन खेळ, पुस्तक प्रकाशन, नाटक, सिनेमा, रेस्टॉरंट या गोष्टींसाठी एकत्र येऊ शकत नाहीत त्यामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक आयुष्यावरही करोनाचा भयंकर परिणाम झाल्याचे जाणवते. जगातल्या अनेक कर्मचाऱ्यांची पगारकपात होत आहे किंवा त्यांना सरळ कामावरून कमी करीत आहेत. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने सांगितले की जगातले ३८% लोक आपलं काम गमावून बसलेत किंवा त्यांची पगार कपात करण्यात आली. यासर्वांबरोबरच लॉकडाऊनमध्ये अत्यंत विषम व विदारक चित्र असे दिसले की गृहकलह, घटस्फोट, एकाकीपणा, चिंता, भीती, नैराश्य यांचही प्रमाण वाढल्याचे चित्र दिसले. मानसिक आरोग्याचा विचार करताना केवळ मध्यमवर्गीयांचा विचार जास्त केला जातो. मात्र तळागाळातील बहुसंख्य लोकांचा विचार करणे खूप गरजेचे आहे. कारण हातावर पोट असलेल्या कुटुंबाचे स्थैर्य गेल्याने नैराश्याचे प्रमाण वाढत आहे.

करोना या सामाजिक दुष्परिणाम –

करोनाने जगात भय व क्लेशदायक परिस्थिती निर्माण केली. संपूर्ण मानवी जीवनामध्ये एक प्रकारची गतिशून्यता आणली आहे. करोना आजार हा आपल्या समाजाला नवी विषमता शिकवतो आहे. त्यातूनच, करोना रूग्णांशी किंवा कोविड योद्ध्यांशी वागताना समाजाचे क्रौर्य उफाळून येते आहे. हा भेदभाव इतका पसरला आहे की करोना गेल्यानंतरही भेदभाव करण्याची ही वृत्ती कायम राहते की काय अशी भीती वाटते. जगातील इतर देशांप्रमाणे भारतही आज या आजाराशी मुकाबला करताना संघर्षमय परिस्थितीतून जातो आहे. करोनाग्रस्तांची संख्या लाखात पोहोचली. करोनाशी मुकाबला करताना सरकार सर्व उपाययोजना करीत आहे. लॉकडाऊनही थोडे शिथिल केले आहे. करोनाग्रस्तांकडे दया भावनेने पाहणे अपेक्षित होते. पण त्या ऐवजी समाजात तिटकारा अधिक प्रकर्षाने जाणवतो. करोनाची लागण झालेल्यांची संख्या वाढत असतानाच दुसऱ्या बाजुला मात्र त्यांच्या प्रती त्यांचेच शेजारी व नातेवाईक असंवेदनशील होताना दिसतात. अनेक ठिकाणी त्या व्यक्तिला अक्षरशः वाळीत टाकण्याचे घटना घडत आहे.

भारतीय समाजव्यवस्था सांस्कृतिकदृष्ट्या एकजिनसी नाही. अनेक धार्मिक, वांशिक, भाषिक गटांचे अस्तित्व आहे. त्याचबरोबर मोठया प्रमाणात आर्थिक विषमताही आहे. करोनाच्या कठीण प्रसंगी एकमेकांविषयी संशय व अनादराची भावना समाजात प्रकर्षाने दिसली. 'सार्वजनिक विवेक' शहरी व ग्रामीण भागातील लोकांमध्ये दिसला नाही. सार्वजनिक विवेकाचे यशापयश त्या त्या समाजातील नागरिकांच्या परहितकेंद्री स्वभावातून प्रदर्शित होते कठीण प्रसंगात समाजबांधवांना मदत करणे हा विवेकाचा भाग. आरोग्य सेवक, पोलिस कर्मचारी, स्थानिक प्रशासनाचे कर्मचारी हेच खऱ्या अर्थाने कोविड योद्‌ध ठरले. या सर्वांनी रूग्णांना बरे करण्यासाठी दिवस-रात्र करोनाशी झुंज देत आहेत. मात्र याच आरोग्य सेवक, पोलिस, स्थानिक कर्मचारी करोनायोद्ध्यांना भेदभाव व सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागले आहे.

करोबाधित रूग्णांवरील सामाजिक बहिष्कारासारख्या वाढत्या घटनांमुळे, पोलिसांना अनेक हौसिंग सोसायटयांना कायदेशीर नोटीसा पाठवाव्या लागल्या आहेत. लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिस यंत्रणा कार्यरत आहे, म्हणजे आज करोना ही आरोग्य विषयक समस्या नसून ती एक कायदा व सुव्यवस्थेचा भाग असल्याची परिस्थिती आहे.

करोना या महामारीमुळे आज संपूर्ण जगातील आर्थिकव्यवस्थेवर फार भयंकर परिणाम झाल्याचे आपणांस जाणवते आहे. प्रसारमाध्यमे व सोशल मीडिया जगभर लोकांना 'करोना' विषयर जागे केले खरे पण जगभर माहिती व अफवांचा जो भडिमार झाला त्याने समाजात खूप तणाव, अंधश्रद्धा निर्माण झाल्या.

करोना मधून बाहेर पडण्यासाठी लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने शिथिल करून जनजीवन पुन्हा सुरळीत करण्याचा संपुर्ण जगात प्रयत्न होत असतानाचा पुन्हा 'करोना' च्या दुसऱ्या लाटेने सुरवात केल्याचे जाणवते आहे. खरचं आता कधी संपणारा हा करोना आणि पुन्हा पूर्ववत लोकांचे जनजीवन कधी सुरू होणार? हा सर्वांनाच पडलेला प्रश्न आहे.

*****



# स्त्रीवादी साहित्य समीक्षा

दुर्गा भिसे
बी.ए.भाग-३



**स्त्रियांचे** स्वतःचे वेगळेपणाची जाणीव प्रकर्षाने व्यक्त करणारे व स्वत्वाचा शोध घेऊ पाहणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. वास्तविक पाहता साहित्याच्या आविष्कारातील कोणत्या साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणता येईल हा एक गुंतागुंतीचा प्रश्न आहे. सहाजिकच पुरुषी साहित्याहून ते वेगळे ठरते. स्त्रीवादी भान हे स्त्री-पुरूष विषमतेच्या प्रश्नांची मांसा करते. हया भिन्न भिन्न स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य. पुरुषप्रधानतेला विरोण करणारे आणि स्त्रीचे माणूस म्हणून चित्रण करणारे साहित्य मग ते पुरुषाने लिहले असले तरी स्त्रीवादी ठरेल. स्त्रीवादी जाणीव स्त्री व पुरुष दोघांमध्येही विकसित होऊ शकते. परंतु पुरुषी वर्चस्वाचा अनुभव वाई होऊन घेणे स्त्रीला अधिक समर्थपणे करता येते, असेही मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचे लेखन अधिक नेमके, धारदार व प्रखर होते. वाईच्या असण्याचा होण्याचा, म्हणजेच अस्तित्वाचा, स्वत्वाचा व अस्मितेचा समग्रतेने वेध घेणारे, तिच्या आत्मशोधाचा प्रवास वाङ्मयीन आविष्कार म्हणून मांडणारे लेखन स्त्रीवादी म्हणता येईल. परंतु स्त्रियांच्या दुःखाच्या करूण कहाण्या पराभूत नियतिवादी दृष्टिकोनातून मांडणारे, त्यांच्याविषयी केवळ दया, करूणा सहानुभुती निर्माण करणारे साहित्य स्त्रीवादी साहित्य म्हणता येणार नाही. स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी सामाजिक जाणीव आहे. स्त्रीवादी साहित्याचा विविध दृष्टिकोनातून उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी अशा अनेक विचारप्रणालीमध्ये स्वतःची भर घालून, स्त्रीवादी भान स्त्री-पुरूष विषमतेच्या प्रश्नांची मांसा करते.

साधारणपणे स्त्रीवादाचा उदय हा १९६० च्या दशकात पाश्चात्य देशांत झाला. १९७५ नंतर ही स्त्रीवादाची जाणिव रूजली स्त्रीवादी जाणीव म्हणजे जगभर प्रदीर्घकाळ जी पितृसत्ताक समाजरचना अस्तित्वात आहे आणि त्यामुळेच लिंगभेद वाढत गेला यातून स्त्रीला गौण व दुय्यम स्थान प्राप्त झाले. स्त्रीचा स्वभाव, कार्यक्षेत्रे, कर्तव्ये या सत्तेने निश्चित केली व स्त्रीवर लादली याची जाणीव म्हणजेच स्त्रीवादी जाणिव होय.

'स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही तर ती घडवली जाते', हे फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सीमॉन द बोव्हाचे विधान आहे.

स्त्रीवादी जाणीव ही स्त्री व पुरुष दोघांत निर्माण होऊ शकते. यात पुरुष हा या जाणिवेचा समर्थक होऊ शकतो परंतु याचा अनुभव मात्र स्त्रीच घेत असते. जाणिवेची प्रथम आवस्था म्हणजे स्त्री-पुरूष विषमतेची जाणिव होणे.

पुरुषरचित स्त्रीत्वाच्या कल्पनेला विरोध करणे ही जाणिवेची दुसरी अवस्था होय. एक व्यक्ती म्हणून स्वत:चा शोध घेता घेता स्त्रीत्वाचा शोध घेणे ही स्त्रीवादी जाणिवेची अंतिम अवस्था आहे. स्त्रीवादी साहित्य हे स्त्री व पुरुष यांचे जगाकडे पाहण्याचे दृष्टिकोणच मुळात भिन्न असतात. असे मानते. स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण, स्त्रियांचे स्वत:चे वेगळे अनुभव व विषय यांचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून दर्शन घडवणारे साहित्य, स्वत:च्या अस्तित्वाचा शोध, आत्मप्रकटीकरण, आत्मशोध. स्त्रीवादी साहित्य व स्त्रीवादी समीक्षा हे प्रकार स्त्रीमुक्ती चळवळीतून उदयास आले सीमॉन द बोव्हाने लिहिलेल्या 'द सेकंड सेक्स' (१९४९) या ग्रंथापासून स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला. स्त्रीवादी साहित्यात एक अभिजात ग्रंथ म्हणून यास मान्यता आहे. यात 'शाश्वत स्त्रीत्व' ही पूर्वग्रहदूषित संकल्पना समाजजीवनातून हद्दपार करण्यासाठी तिने या प्रबंधातून बौद्धीक व भावनिक पातळीवर युक्तिवाद मांडले. स्त्री-पुरुषातील विषमता ही जीवशास्त्रीय नसून केवळ संस्कृती निर्मित आहे. दोघांत इतर कोणताही भेद नसताना केवळ शरीर रचनेतील भेदामुळे स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते असे मत यातून मांडले आहे.

पाश्चात्य देशांत १९ व्या शतकात अखेरच्या कालखंडात स्त्रीवादी साहित्य प्रभाविपणे जोम धरू लागले. या काळातील सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमीवर 'घर नावाचे मंदिर आणि त्यातली त्यागी, देवतेसमान असणारी गृहिणी'. चित्रित झाली स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांच्या लेखनपरंपरेचा इतिहास सिध्द करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांतून एक 'स्त्रीकेंद्री' साहित्यप्रवाह करण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांतून एक 'स्त्रीकेंद्री' साहित्यप्रवाह निर्माण झाला. ॲलन मोअर्सचे लिटररी विमेन (१९७६), ॲलन शोकॅलअरचे अ लिटरेचर ऑफ देअर ऑन (१९७७) आणि सँड्रा गिल्बर्ट आणि सूसान ग्यूदर यांचे 'द मॅड-वुमन इन द ॲटिक' या पुस्तकांतून प्रामुख्याने ह्या स्त्रीकेंद्री साहित्यप्रवाहांचे दर्शन घडते. पाश्चात्य देशात स्त्रीमुक्ती चळवळ वेगाने फोफावली व तिचाच एक भाग असलेली स्त्रीवादी साहित्य समीक्षा वेगवेगळ्या अंगोपांगावर भर देत विकास पावली. उदा. फ्रेंच स्त्रीवादी समीक्षेने मुख्यत्वे भाषिक अंगाने स्त्रीवादी साहित्याचा वेध घेतला. तसेच मानसशास्त्रीय भूमिकेतून स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीच्या मानसिक कोंडमाऱ्याचे, परवशतेचे विश्लेषण केले. त्याप्रमाणे इंग्रजी स्त्रीवादी समीक्षा ही स्त्री शोषणावर भर देते. इंग्रजी स्त्रीवादाने मार्क्सवादी दृष्टिकोन स्वीकारला. अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेने स्त्रियांच्या वाङ्ममयीन आविष्कारांचा शोध घेतला. हे सर्व प्रकार म्हणजेच स्त्री भूमिकेतून स्त्रीवादाचा अभ्यास होय.

शार्लट गिलमन ही स्त्रीवादी लेखिका ह्या काळात जगभर नावाजली. 'विमेन अँड इकॉनॉमिक्स' (१८९८) या तिच्या प्रसिद्ध ग्रंथात तिने स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनावर व स्वातंत्र्यावर विशेष भर दिला. स्त्रीच्या लैंगिकतेला व तिच्या मातृत्वाला जास्त प्राधान्य दिले गेल्याचे सांगितले आणि त्यामुळेच तिच्या आर्थिक क्षमतांना हानी पोहोचल्याचे सांगितले. आर्थिक स्वावलंबन हेच तिला खरे स्वातंत्र्य मिळवून देईल असे प्रतिपादन केले आहे. याबरोबरच इंग्रजी कादंबरी कर्ती व्हर्जिनिया वुल्क हिने स्त्रीमुक्ती संदर्भात लिहलेला निबंध - 'ए रूम ऑफ वन्स ओन' हा स्त्रीवादी समीक्षेचा उत्कृष्ठ नमुना म्हणता येईल. व्हर्जिनिया वुल्क यांनी या निबंधात साहित्यिक स्त्रिया आणि कादंबरी यांच्यातील ऐतिहासिक संबंधाचा आढावा तिने घेतला आहे. पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. त्यामुळे त्यांना व्यवसायिक लेचन करता आले नाही. जर स्त्रीला आर्थिक स्वावलंबन मिळाले समाजात प्रतिष्ठा मिळाली की स्त्री सर्जनशीलतेची अत्युच्च शिखरे गाठू शकतील. स्त्रियांनी आपल्या लेखनात उपरोध, विनोद, विडंबन ही शस्त्रे वापरून पुरुषी व्यवस्थेविषयीचा आपला विरोध प्रकट करावा असेही तिने सूचित केले.

अमेरिकन स्त्रीवादी समीक्षक ॲलन शोवॉल्टर हिने स्त्रीवादी समीक्षेचे आदय रूप विकसित केले. हिने इंग्रजी वाङ्मयातील उपेक्षित स्त्रीलेखिका शोधून काढून त्यांना समीक्षेतून व्याय देण्याचे काम केले ब्रिटिश स्त्री कादंबरीकाराच्या लेखनातून जे प्रवाह दृष्टीस पडले त्याचे वर्गीकरण केले यात पुरुषसत्ताक समाजात गौणत्व स्वीकारून स्त्रियांनी जगणाऱ्या स्त्रियांनी त्यावद्दल राजकीय भूमिका न घेता केलेले लेखन आणि पुरुषसत्ताक किंवा लिंगवादी समाज



व विचारसरणी यांच्याविरुद्ध ठाम राजकीय दृष्टीकोन स्वीकारून स्त्रियांनी केलेले लेखन खरे तर स्त्रीची विशिष्ट अशी संस्कृती असते. स्त्रियांच्या लेखनातून त्यांच्या अनुभवचित्रणातून त्याचे आशय-विषय मांडणीतून, वाङ्मयीन रूपबंधातून स्त्री संस्कृती प्रकट होताना दिसते. स्त्रीवादी साहित्याची भाषाशैली, अविष्काराची पद्धती, वाङ्मयीन मूल्ये या घटकांतून स्त्री-संस्कृती प्रकटताना दिसते. स्त्रीवादी समीक्षा स्त्रीयांच्या साहित्याचा जीवशास्त्रीय, भाषिक, मानसशास्त्रीय, सांस्कृतिक दृष्टीकोनातून वेगळेपण अधोरेखित करते. स्त्रियांच्या लेखनाचा असा वेगळा स्वतंत्र विचार करणाऱ्या समीक्षेला ॲलन शोवॉल्टरने 'गायनोक्रिटिक' (स्त्री-समीक्षक) असे संबोधले आहे.

भारतीय स्त्री ही चूल आणि मूल पर्यंत मर्यादित ठेवणाऱ्या व्यवस्थेला बेकर मारून, स्त्रियांनाही पुरुषाबरोबरीने स्थान मिळावे यासाठी म. फुले यांनी आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करून स्त्रियांना शिक्षणाची कवाडे खुली केली. स्त्रीवादी चळवळीतील अग्रणी विचारवंत म्हणून विदया बाळ यांचा उल्लेख करावा लागेल.

भारतीय स्त्री समाजात समानतेने वावरणे, संपत्तीवरील अधिकार, शिक्षण किंवा मतदान यापासून वंचित होत्या. मात्र १९ व्या शतकाच्या मध्यावर आपल्या हक्कांविषयी त्यांच्यामध्ये सजगता येऊ लागली. त्या काळातील स्त्री लेखिका जरी तथाकथित उच्चवर्गातून आलेल्या व उच्चवर्गातील स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या असल्या तरीसुद्धा त्यांनाही आप्तस्वकीयांच्या प्रखर रोषाला सामोरे जावे लागले. या स्त्रीवादी साहित्याच्या पहिल्या हुंकाराच्या पाठीशी आपल्या विचाराचे पाठबळ समर्थपणे उभे करण्याचे महत्त्वाचे कार्य जोतीबांनी केले. विख्यात विदुषी पंडिता रमाबाईंना मराठी पत्रकर्त्यांनी दिलेली दुषणे खोडून काढण्यासाठी, तसेच बुलढाण्याच्या ताराबाई शिंदे यांनी लिहीलेल्या 'स्त्री-पुरुष' तुलना नामक पुस्तकावरील पुरुषी पूर्वग्रहदूषित टीका परतून लावण्यासाठी 'सत्सार' या आपल्या अनियतकालिकाचा विशेष अंक जोतीरावांनी काढला आणि संवादरूपाने स्त्रीमुक्तीचा संदेश दिला.

इ.स.१८८५ ते १९५० या काळात मराठी वाङ्मयात लिहल्या गेलेल्या स्त्रीवादी साहित्याची प्रमुख प्रेरणा म. फुले यांची आहे. 'ऑल इंडिया वीमेन्स कॉन्फरन्सला' २० व्या शतकाच्या सुरवातीस पाठवलेल्या संदेशात म.गांधी म्हणतात. 'जिला आपण अवला म्हणतो, ती स्त्री ज्या क्षणी सवला होईल त्या क्षणी जे कोणी असहाय आहेत ते सर्व शक्तीमान होतील'. या विचाराला अनुसरून स्त्रीमुक्ती, स्त्रीशिक्षण, स्त्रीसवलीकरण पुरस्कार केला.

इंग्रजी राजवटीमुळे झालेली आधुनिक जाणीव शिक्षणाने व नव्या विचाराने जागृत झालेला आत्मसन्मान यामुळे स्त्रियांच्या व पुरुषांच्याही स्त्रीवादी लेखनाला चालना मिळाली. रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले, लक्ष्मीबाई टिळक, संजीवनी मराठे, शांता आपटे, आनंदीबाई कर्वे, लीला पटवर्धन, इंदिरा भागवत आदी स्त्रियांनी प्रामुख्याने आत्मचरित्रे, कथा व स्फुट लेखनातून स्त्रियांचे भावविश्व उलगडले.

इ.स. १९५० पर्यंतच्या मराठी वाङ्मयात स्त्रीवादी विचारांचे पात्रे परखडपणे चित्रित करण्याचे धाडस विभावरी शिरूरकद यांनी सर्वप्रथम केले. विभावरी स्त्रियांच्या लेखनाला स्त्रीत्वाचे सत्व सापडलेले आढळून येते.

'हिंदोळ्यावर' या कादंबरीतील नायिका या व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रखर जाणिवांचा आविष्कार करतात. इ.स. १९६० नंतर जागतिक वाङ्मयात स्त्रीवादी विचाराने जोर धरला मात्र १९७० च्या दशकात स्त्रीवदाची तात्विक बैठक मराठी वाङ्मयात स्वीकारली जाऊ लागली.

आज स्त्री गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाली आहे. तरी पण तिला दुहेरी भूमिका पार पाडाव्या लागतात. नोकरी व घराची जबाबदारी तिलाच पार पाडावी लागते.

******

# कर्मवीरांना वंदन !

देहाचे केले चंदन
कर्मवीरांना वंदन !
आमचे कर्मवीरांना वंदन !
महाराष्ट्राच्या कडेकपारी
क्रांतीची घुमली वैखरी
कामगार आणि शेतकरी
कर्मवीर दीनांचे कैवारी
ज्ञानरूपी फुलविले नंदनवन
कर्मवीरांना वंदन!
आमचे कर्मवीरांना वंदन !
मंत्र स्वावलंबनाचा दिला
स्वःकष्टाने शिक्षण घेण्याला
कष्टकऱ्यांच्या गरजू मुलाला
स्थापले वसतिगृह गोरगरिबाला
जात धर्माचे तोडले बंधन
कर्मवीरांना वंदन !
आमचे कर्मवीरांना वंदन!
शिक्षण महर्षी रयतेचा वाली
ज्ञानकुंभ वडाच्या झाडाखाली
ज्ञानवंत गुणवंत केली
बहुजनांची असंख्या मुले-मुली
त्याग प्रेमाचे शीतल चंदन
कर्मवीरांना वंदन !
आमचे कर्मवीरांना वंदन !

कु. पुजा माने
बी.ए.भाग-३

# मुलगी आहे म्हणून

मुलगी आहे म्हणून
राहणार नाही मागे
सावित्रीच्या लेकिला
मिळाले शब्दांचे सामर्थ्य

मी नाकारलीय आता
कळयांना पायदळी
तुडविण्याची परंपरा
मी नाकारलेय माझे
चारभिंतीमधील अस्तित्व
मी लेखण्यांचे पंख घेऊन
झेप घेत आहे आभाळावर

पुरूषप्रधान मक्तेदारीची चौकट
कधीच मोडीत काढली आहे
आता हरेक क्षेत्रावर आमच्या
कार्य कर्तुत्वाची मुद्रा उमटत आहे

मुलगी आहे म्हणून
तुमचे मनसुबे पूर्ण होणार नाहीत
कारण कायद्याचे कवचकुंडले
मला मिळाले आहेत.



कु. रेखा सकटे
बी.ए.भाग-२



# शेतकरी

राजा माझा शेतकरी
अवघ्या जगाचा पोशिंदा
सर्जा राजा त्याच्या जोडिला
रात्रंदिवस त्यासी एकच धंदा
पोटी घेऊन चिगटा
करतो मग पेरणी
घाम गाळून शेतामंधी
पीक घेई सोन्यावाणी
कष्ट करून अमाप
सुख त्याला येईना
सेवा करून काळया आईची
दुःख काही जाईना
अनेक संकटं आल्यावर
कोसळून तो पडतो
आणि पुन्हा नव्या उमेदिने
तो कष्टाला जुंपतो
पिकवलेल्या सोन्याचं
कधी मोल नाही होतं
तरी लाचार होऊन
तो कुणापुढे नाहीच झुकतं

मृदुला धडाम
बी.ए.भाग-२



# जीवन एक संघर्ष

जीवन एक संघर्ष
निराश कधी होऊ नये
अपयश आले तरी
प्रयत्न कधी सोडू नये
जीवन एक प्रवास
चालणे कधी थांबू नये
निरंतर गतिमान राहून
प्रवाह कधी थांबवू नये
कठीन परिश्रमाला
जीवनात पर्याय नाही
कोणत्याही शॉर्टकटने
यश कधी मिळत नाही
यश अपयशा पलिकडे
जीवनात आनंद शोधत जाऊ
जीवनाचा खरा अर्थ
जीवन संघर्षात पाहू

कु. दुर्गा भिसे
बी.ए.भाग-३



# माहिती तंत्रज्ञानाचे युग

नात्याचे भाववंध तुटून गेलेत
प्रत्येक माणूस आतून उसवला आहे
हृदयाला हृदय जोडणारा संवाद
होत नाही माणसा माणसात

प्रत्येकजण मोबाईलमध्ये हरवला आहे
आजी आजोवांच्या गोष्टी
टीव्हीने हद्दपार केल्यात
आई वाप वृद्धाश्रमात झुरतात
मुलांचे वालपण कैद झालेय

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात
शोधूनही सापडत नाही
आज माणसाचं माणूसपण

यंत्रासारखा माणूसही
मोजला जातोय पैशाच्या तराजूत
पैशाच्या मागे धावता धावता
माणसे आज हरवून गेले आहेत.
आनंद सुख आरोग्य वरेच काही
माहिती तंत्रज्ञानाच्या युगात

सुनिता चव्हाण वी.ए.भाग-१




# प्रश्न

कालच्यासारखा आता
दिवस सुखाने उगवत नाही
वाईट वातम्यांशिवाय
रात्रही सरत नाही
नकारात्मक वातम्यांनी
काळजात धडकी भरते
माणूसकीचे होते लॉकडाऊन
अनामिक भीती काळजात घर करते
कोरोना आजार की संकट
की दुसरेच अजून काही
वेरोजगारी, भूक घुसमटीचा
ताळमेळ कोणी का लावत नाही?

कु. रोहिणी जाधव वी.ए.भाग-

# लक्ष्मीचं देणं

भुकेजलेल्या लेकरांसाठी
मोडी सौभाग्याचं लेणं
त्याग समर्पणाची मूर्ती
लक्ष्मीचं थोर देणं
रयतेची होती सावली
दीन लेकरांची
माया कणवाळू माऊली

बहुजन समाजामध्ये
केली शिक्षणाची क्रांती
ज्ञानदीप लाविले जगी
प्रकाशाच्या पेटविल्या वाती

कु. राधा कुंभार
बी.ए.भाग-२









रयत शताब्दी कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य मुजावर एम्.एस्. यांचा सहभाग



भूगोल विभागांतर्गत आयोजित पर्यावरण रक्षण हेच मानवी जीवन या एकदिवसीय कार्यशाळेसाठी उपस्थित प्रमुख पाहुणे मा. संध्या चौगुले मॅडम आणि डॉ. सुधीर कुंभार यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य



संबोधी प्रतिष्ठान सातारा यांचेमार्फत घेण्यात आलेल्या संविधान परिक्षेत प्रथम आलेले मा. सागर गायकवाड व मा. अभिजीत पाटील यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, सोबत उपप्राचार्य सुरेश साळुंखे व डॉ. सकटे एम. टी.




राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत Covid-19 विषयी जागृती म्हणून मौजे कळंत्रेवाडी येथे मास्कचे वाटप करताना NSS स्वयंसेविका




महाविद्यालयाच्या भरतीपूर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थीनी Covid-19 विषयी पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती करताना




राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत Covid-19 विषयी पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती करताना NSS स्वयंसेविका

रयत शिक्षण संस्थेचे,
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

त्रिवेणी २०२०-२१


NSS विभागाच्यावतीने Fit India या मोहिमेअंतर्गत Walking करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफ


NSS विभागाच्यावतीने दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त भ्रष्टाचार विरोधी शपथ घेताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, उपप्राचार्य, नॅक कोऑर्डिनेटर व महाविद्याल्याचा स्टाफ


Covide-19 च्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थिनींचे तापमान तपासताना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. [illegible]


शॉर्ट टर्म कोर्स ब्युटी अँड वेलनेस अंतर्गत प्रॅक्टिस करताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी


शॉर्ट टर्म कोर्स फॅशन डिझायनिंग आणि टेलरिंग प्रॅक्टिस करताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी


महाविद्यालयाच्या पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राअंतर्गत प्रॅक्टिस करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी


शॉर्ट टर्म कोर्स कुकरी चा आढावा घेताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे व कुकरी प्रशिक्षिका सौ. श्रुती कुलकर्णी


महामारीच्या काळात मास्क शिवताना NSS स्वयंसेविका कु. ऐश्वर्या अर्जुगडे

रयत शिक्षण संस्थेचे
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

त्रिवेणी २०२०-२१


पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राअंतर्गत प्रॅक्टिस करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी


पर्यावरण रक्षण हेच मानवी जीवन या कार्यशाळे प्रसंगी अध्यक्षीय विचार व्यक्त करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य


महाविद्यालयाच्या जिम मध्ये व्यायाम करताना विद्यार्थीनी


शॉर्ट टर्म कोर्स कराटे चे प्रशिक्षण घेताना बी. ए. भाग-१ मधील विद्यार्थीनी


शॉर्ट टर्म कोर्स, कराटे चा आढावा घेताना व विद्यार्थीनीशी संवाद साधताना मा. प्राचार्य


शॉर्ट टर्म कोर्स ऑफीस ॲटोमेशन चे प्रशिक्षण घेताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी


शॉर्ट टर्म कोर्स 'Tally ERP' चे प्रशिक्षण घेताना महाविद्यालयातील विद्यार्थीनी


क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ


वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करताना मा. प्राचार्य अनिल पोतदार, मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे व विद्यार्थीनी


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर यांचा ललित साहित्य पुरस्कार मा. अभयकुमार साळुंखे यांचे हस्ते स्वीकारताना डॉ. उमाप ए. एस्.


Tally ERP-9 या विषयावर मार्गदर्शन व पुस्तक वाटप करताना मा. श्री. भानुदास यादव मा. श्री. राहुल कोळी


विक्री एक कला या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करताना मा. महेंद्र कुलकर्णी (दि. ४/२/२०२१)


Traditional Day मध्ये सहभाग घेतलेल्या B.Com-I च्या विद्यार्थीनी व महाविद्यालयाचा स्टाफ


व्यवस्थापन क्षेत्रातील रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.मोहन भोसले, सातारा (दि. २९/०४/२१)


वाणिज्य क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा. प्रा. डॉ. दत्तात्रय थवरे


IBPS सेंटर उद्घाटन प्रसंगी ऑनलाईन मार्गदर्शन करताना मा. श्रीकांत कळसकर



# हिंदी विभाग

" मानव मानव को बढाओ
उसे अम्बर तक चढाओ
अंक ऐसे आँक दे वह
चाँद सूरज ढाँक दे वह । "

– श्री. भवानी प्रसाद मिश्र

विभागीय संपादक
प्रा. कोळी एस. टी.

# अंतरंग

## गद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) भाषा क्षेत्र का अनोखा आविष्कार 'शालू' रोबोट | कु. यास्मिन अत्तार (बी.ए.भाग-तीन) | १५ |
| २) डॉ. नीरजा माधव के 'यमदीप' उपन्यास में किन्नर विमर्श | कु. ज्योति पवार (बी.ए.भाग-तीन) | १७ |
| ३) रेतसमाधि - नारी जीवन की व्यथा। | कु. प्रेरणा मोहिते (बी.ए.भाग-दो) | १९ |
| ४) संतोष आनंद हिंदी भाषा के प्रचारक। | कु. विजया कदम (बी.ए.भाग-दो) | २० |


## पद्य विभाग


| | | |
|---|---|---|
| १) दुःख | कु. सानिका जाधव, (बी.ए.भाग-एक) | १६ |
| २) शेरो शायरी | कु. प्रणाली घाडगे (बी.ए.भाग-एक) | १६ |
| ३) बेटी | कु. प्रतिक्षा सूर्यवंशी (बी.ए.भाग-एक) | १८ |
| ४) जिंदगी | कु. रिजवाना अत्तार (बी.ए.भाग-एक) | १८ |




# भाषा क्षेत्र का अनोखा आविष्कार 'शालू' रोबोट।

कु. यास्मिन अत्तार (बी.ए.भाग-३ हिंदी)

**भाषा** के बारे में वर्तमान समय मे लोगों के मन मे एक नकारात्मक सोच थी। भाषा केवल विचार-विनिमय का साधन है। कुछ हद तक ज्ञान प्राप्ति का भांडार है। भूमंडलीकरण के दौर में हिंदी भाषा बाजार की भाषा बनी। फिर एक बार स्वार्थवश क्यो न हों। विदेशी लोगों को भारत में व्यापार करने हेतु हिंदी का सहारा लेना पडा। भाषा के क्षेत्र में कोई रोजगार के अवसर नहीं है। ऐसी चर्चा भी लोगों द्वारा शुरू हुई थी। इस समस्या में अवसर ढूँढने का प्रयास एक अध्यापक ने किया हैं। इसी कारण भाषा प्रेमियों के लिऐ गर्व महसूस हो रहा है।

* हॉन्ग कॉन्ग में भाषा संबंधी पहला रोबोट :-

भारत के रोबोट की बात करने से पहले वैश्विक स्तर पर अन्य देशों में कहाँ ऐसे रोबोट का निर्माण हुआ है। यह देखना अनिवार्य था। तब हॉन्ग कॉन्ग देश में सोफिया रोबोट का निर्माण हुआ है। इस बात के बारे में जानकारी मिली। उस रोबोट का नाम है - 'सोफिया'। सोफिया' को संयुक्त अरब अमीरात में नागरिकता देने का कार्य हुआ है। 'सोफिया' का काम मनुष्य से काफी मिलता-जुलता है। यह बात भाषा के क्षेत्र मे कार्य करनेवालों केलिए गर्व की बात है।

* भारत में 'सोफियाँ' की अगली पीढी 'शालू' :-

'सोफिया' से प्रेरणा लेकर 'शालू' का निर्माण भारत में हुआ। यह अर्ध्दमानवीय रोबोट बनाया गया है। 'शालू' मानवीय संवेदनाओं को खूब अच्छी पद्धति से समझती है। वह लोगों से मिलने के बाद उनके समान व्यवहार करने का काम करती है। यह किसी भी भाषा के लिए गौरव वाली बात है। इस क्षेत्र में भारत मे शायद यह पहला ही प्रयोग हुआ । इसी कारण भारतीय लोगों के लिए यह महत्वपूर्ण बात है।

* 'शालू' की विशेषताएँ :-

'शालू' रोबोट क्या काम करता है। उसे जानना भी आवश्यक है। भारत की ९ भाषाओं को अच्छी पध्दति से बोलने और उसमें व्यवहार करने की क्षमता रखता है। उन भाषाओं में - मराठी, हिंदी, उर्दू, भोजपुरी, बांग्ला, गुजराती, तमील, तेलगु और मलयालम आदि भाषाओं व्यवहार करती है। इसके अतिरिक्त ३८ विदेशी भाषाओं की भी जानकारी रखती है। साथ ही 'शालू' बच्चों को पढाने में सहायती करती है। 'शालू' मानव के आनंद और क्रोध की भावनाओं को अच्छी पद्धति से समझती है। वह उसके अनुरूप प्रतिक्रिया देती है।

* सोफिया और शालू का आपसी संबंध :-

'शालू' के निर्माण में 'सोफिया' का सबसे बडा सहयोग है। 'सोफिया' को काशी हिन्दू विश्वविद्यालय में एक कार्यक्रम में लाया गया था। उस समय इस मशीन के बारे में लोगों को पता चला। इसी कारण सोफिया से ही शालू का निर्माण करने की

प्रेरणा मिली। इसी कारण दोनों में बहुत करिबी संबंध थे।

- शालू को बनाने वाले दिनेश पटेल :-

'शालू' को बनाने का श्रेय दिनेश पटेल नामक शिक्षक को जाता है। वे जौनपुर जिले के मडियाहू के रजमलपुर गाव निवासी केंद्रीय विद्यालय मे अध्यापक है। दिनेश जी की पढाई एमसीए तक हुई है। साथ ही मुंबई आईआईटी के केंद्रीय विद्यालय में कंम्प्यूटर साइंस के अध्यापक है। फिल्म 'रोबोट' की प्रेरणा भी इस कार्य में मिली है।

- शालू का निर्माण :-

शालू को बनाने की शुरुआत २०१७ वर्ष में हुई थी। उसके लिए आवश्यक सामग्री इस कार्य में बाधक बनी। उन्होंने प्राप्त साधनों से काम चलाया उसके लिए प्लास्टिक, गत्ता, लकडी व एल्युमिनियम का प्रयोग किया गया है। यह मनुष्य के समान हावभाव भी दर्शाता है। इसे तैयार करने तीन साल का समय लगा और उसके लिए पचास हजार रु. का खर्चा आ गया।

उपर्युक्त बातों से हमें 'शालू' के कार्य का पता चला इसके साथ वह मनुष्य के समान लोगों को पहचानना, उन्हे याद रखना, बातचीत करना, सामान्य ज्ञान, गणित की क्रिया और शैक्षिक प्रश्नों का उत्तर देने का कार्य करती है। लोगों को दैनिक भविष्य बताना, खाना बनाने की पद्धति, मौसम की जानकारी, पुस्तक समीक्षा और फिल्म समीक्षा आदि कार्यों में मनुष्य को सहायता करने का कार्य इसके द्वारा होता है।

# दुःख

क्या परिभाषा दुःख की  
कहाँ से उत्पन्न हुआ यह शब्द  
कोई जानता है? कोई कहे  
कठिनाइयों का ढेर लगे  
तो वह दुःख है  
सुख मे पडी बाधा को  
दुःख कहते है  
शांत पानी में कंकड फेंकने पर  
हुई हलचल को भी  
दुःख का ही रूप कहा जाता है।  
पर यही भी सत्य है  
गर्भवती स्त्री के दुःखते शरीर से  
सुख का आगमन होता है  
दुःख कोई आश्चर्यजनक शब्द नही  
दुःख की भाषा सुख जानता है  
परम सुख में भी बसा रहता है  
अपरिहार्य दुःख ।

कु. सानिका जाधव (बी.ए.भाग -I)

# शेरो–शायरी

१. छूले आसमाँ जमीं की तलाश ना कर  
जीले जिंन्दगी खुशी की तलाश ना कर,  
तकदीर बदल जायेगी खुद ही मेरे दोस्त,  
मुस्कुराना सिख के वजह की तलाश ना कर.

२. उलझी शाम को पाने की जिद न करो,  
जो ना हो अपना उसे अपनाने की जिद न करो  
इस समंदर में तुफान बहुत आते है,  
इसके साहिल पर घर बनाने की जिद न करो.

3. इस कदर हम उनकी मोहब्बत में खो गए,  
की एक नजर देखा और बस उन्हीं के हम हो गए,  
आँख खुली तो अँधेरा था, देखा एक सपना था  
आँख बंद की और उन्हीं सपनों में फिर सो गए.

४. किसी की चाहत पर दिल से अमल करना,  
दिल टूँटे ना उनका इतनी फिकर करना,  
ये जिन्दगी खास है, सबके लिए,  
पर आप जिनके लिए खास है, उनकी कदर क






# डॉ. नीरजा माधव के 'यमदीप' उपन्यास में किन्नर विमर्श

कु. ज्योति पवार बी.ए. भाग-३

**हिंदी** साहित्य में १९६० के बाद काफी परिवर्तन आ गए है। उसके परिणाम स्वरूप साहित्य का रूप भी बदला हुआ दिखाई देता है। साहित्य समाज का दर्पण माना जाता है। इसी कारण समाज में घटित होनेवाली हर बात का साहित्य में चित्रण होती है। इस समय में विभिन्न विमर्शो पर चर्चा हुई है। जिनमें-आदिवासी, शिक्षा, श्रमिक, दलित, स्त्री, किसान और किन्नर इन बातों पर अभी लोगों ने लिखना शुरू किया है।

किन्नर विमर्श पर लेखन करने वाले साहित्यकारों में डॉ. नीरजा माधव-यमदीप, प्रदीप सौरभ - तीसरी ताली, निर्मला भुराडिया गुलाममंडी, चित्रा मुद्गल-पोस्ट बॉक्स नं. २०३ नालासोपारा, महेंद्र भीष्म-में पायल और अनुसूया त्यागी - मैं भी औरत हूँ आदि रचनाओं में किन्नर विमर्श पर विचार किया है। समाज का सबसे उपेक्षित विषय किन्नरों का माना जाता है। थर में और घर के बाहर भी इन्हें उपेक्षित दृष्टि से देख जाता है।

'यमदीप' उपन्यास में डॉ. नीरजा माधव जी ने नाजबीबी के माध्यम से किन्नरों की समस्याओं को उद्घाटित करने का प्रयास किया है। एक पागल स्त्री द्वारा बच्ची का जन्म होता है। स्वयं को उच्च वर्गीय कहने वाले लोग उस बच्ची के परवरिश की जिम्मेदारी नहीं लेते है। उस बच्ची के माँ अर्थात पागल स्त्री पर बलात्कार हुआ था। इससे उच्चवर्गीय समाज की दिखावटी प्रतिष्ठा पर प्रकाश डाला है।

नाजबीबी को छैलू नामक अस्पताल में काम करनेवाला लडका इस बच्ची को पोंछने को कहता है। उसकी भूख मिटाने के लिए गाय का दूध देने की व्यवस्था करता है। किन्नरों द्वारा प्रतिष्ठित लोगों की आलोचना की जाती है। यह पागल स्त्री को भी नही छोडते? नाजबीबी के आवाहन को भी प्रतिष्ठित समाज कोई सहायता नहीं करता। किन्नरों के गुरू महताब की आज्ञा से उसके परवरिश के लिए तैयार हो जाते है। उसके नामकरण की जब चर्चा शुरू होती है। तब महताब कहती है, '' रात-बिरात एक पागल के साथ मुँह काला किया; धरम की बात पर.......थू है ऐसे धरम पर, और ऐसे धरम वालों पर'' इसका नाम सोना ही होगा।

बाद में उसकी पढाई की व्यवस्था भी किन्नरों द्वारा की जाती है। नाजबीबी के इस कार्य में होमगार्ड रामसरन का तबादला दूसरे शहर में होता है। वह सोना को सगी बेटी के समान प्यार देता है। नाजबीबी का वास्तविक नाम नंदारानी है। उसके घरवालों ने उसे किन्नर होने के कारण उसको घर से बाहर किया था; क्योंकि यह बात उनके परिवार के लिए प्रतिष्ठा का मुद्दा था। उसका घरवालों से बात करना । उसके भाई और भाभी को अच्छा नहीं लगता था। माँ की कैंसर से मृत्यु होने कारण वह अपने घर चली जाती है। तब माँ की चिता को आग लगायी जाती है। वापस लौटते समय नाजबीबी में एक वात्सल्य भाव है। वह अपने भाई को पिता का खयाल रखने की बात करती है। नाजबीबी अच्छे घर में पैदा हुई थी। इस प्रकार किन्नरों को स्वयं के घर में भी स्वीकारा नहीं जाता।

सोना को बडे कष्टप्रद रूप मे किन्नरों ने पाला था। तब उसके जीवन में नया मोड आता है। सोना को नारी उद्धार गृह में भेजना पडता है। सोना को इस बात का गहरा दु:ख होता है। उसी समय गृह की लडकियों पर गलत काम करने की खबरे समाचार पत्रों से प्रकाशित होती है। इसमे समाज के प्रतिष्ठित नेता भी सहभागी है। यह बात सुनकर नाजवीवी को बहुत दु:ख होता है।

इस प्रकार 'यमदीप' उपन्यास में डॉ. नीरजा माधव जी ने किन्नरों की सामाजिक स्थिति, उनके परिवारवालों का उनके प्रति देखने का नजरिया, समाज का उनके प्रति हीन दृष्टिकोन, उनके प्रति सामाजिक नकारात्मक रवैया, और मनुष्य के रूप में अस्वीकार आदि बातों का चित्रण इसमें हुआ है। यह वर्तमान युग में सबसे बडा चिंता का विषय है। हम उन लोगों को मनुष्य के रूप में स्वीकृत करने को मानसिक रूप में तैयार नहीं है।

*****

# बेटी

वेटा वारीस है, वेटी पारस है।
वेटा वंश है, वेटी अंश है।
वेटा आन है, वेटी शान है।
वेटा तन है, वेटी मन है।
वेटा मान है, वेटी गुमान है।
वेटा संस्कार है, वेटी संस्कृति है।
वेटा आग है, वेटी वाग है।
वेटा दवा है, वेटी दुआ है।
वेटा भाग्य है, वेटी विधाता है।
वेटा शब्द है, वेटी अर्थ है।
वेटा गीत है, वेटी संगीत है।
वेटा प्रेम है, वेटी पूजा है।

कु. प्रतिक्षा सूर्यवंशी (बी.ए.भाग -I)



# जिंदगी

जिंदगी एक खेल है,
ये खेल हमे मिलकर खेलना है,
जिंदगी एक विश्वास है,
ये विश्वास हमे सबसे जीतना है,
जिंदगी एक सपना है,
अच्छे सपने हमे देखकर पूरे करने है,
जिंदगी एक वक्त है,
हमे अच्छे-बुरे वक्त से गुजरना है,
जिंदगी एक प्यार है,
हमे सबसे प्यार पाना है,
जिंदगी एक मिठास है,
हमे सबसे मिठे शब्द सुनाने हैं,
जिंदगी एक हार है,
जिंदगी में कभी - कभी हार अच्छी होती है,
जिंदगी एक
जिंदगी एक गाना है,
ये गाना हमे खुद ही गाना है,
जिंदगी एक परिवार है,
हम सबको इस परिवार से ही गुजर जाना है,
जिंदगी एक पाठशाला है,
मस्ती और पढाई पाठशाला में करनी है
जिंदगी एक समाधान है,
अच्छे कर्म और मेहनत के बाद समाधान मिलना ही
जिंदगी एक जीत है,
समय आने पर हमे जीत हासिल करनी है,
जिंदगी एक जिंदगी है,
इस रास्ते से सभी को चलना है,

कु. रिजवाना आत्तार (बी.ए.भाग -I)




**हिंदी** के समकालीन साहित्यकारों में गीतांजली श्री का नाम प्रसिद्ध है। उन्होंने परंपरागत मार्ग पर न चलते हुए उन्होंने नए विषयों पर साहित्य लिखने का कार्य किया है। 'स्त्री' जीवन उनके साहित्य का केंद्रीय विषय रहा है। उन्होंने उपन्यास, कहानी, संपादन और जीवनी आदि क्षेत्रों में सिद्ध हस्त लेखनी चलायी है।

कहानी साहित्य में उन्होंने-वैराग्य, अनुगूँज, मार्च माँ और साँकुरा, यहाँ हाथी रहते थे और प्रतिनिधि कहानियाँ आदि रचनाएँ प्रकाशित है। उपन्यासों में माई, हमारा शहर उस वरस, तिरोहित, खाली जगह और रेतसमाधि यह उपन्यास भी प्रसिद्ध है। संपादन में उन्होंने हिंदी प्रसिद्ध साहित्यकार अज्ञेय की कहानियों का संकलन 'अज्ञेय कहानी संकलन' नाम से संपादन किया है।

गीतांजलि श्री का 'रेतसमाधि' यह उपन्यास राजकमल प्रकाशन द्वारा वर्ष २०१८ ई मे प्रकाशित हुआ है। प्रस्तुत उपन्यास में नारी जीवन की दोहरी मानसिकता का चित्रण किया है। साथ ही भारत और पाकिस्तान विभाजन के वाद लोगों पर इसके कितने भयानक परिणाम हुए। इस वात को आधार वनाकर इस उपन्यास की रचना हुई है। 'रेतसमाधि' उपन्यास की नायिका 'चंदा' है। घर के वच्चे उसे 'अम्मा' कहते थे। पति के मृत्यु के वाद अम्मा पलंग पकड लेती है। उसे उठाने का प्रयास घर के सभी लोग करते है। फिर भी उसके व्यवहार में कोई वदलाव नहीं आता।

एक दिन अम्मा पलंग से उठकर वाहर घूमने चली जाती है। उसे घरवाले ढूँढते है। वह पुलिस थाने में मिल जाती है। वाद में वह अपनी वेटी जो 'लिव इन रिलेशनशिप' में रहती है। उसके पास चली जाती है। वाद में अम्मा वेटी की सहायता से पासपोर्ट वनाती है। उसके द्वारा वह पाकिस्तान जाने की योजना वनाती है। उसका पाकिस्तान जाने का उद्देश्य किसी को भी अवगत नहीं था। वाद में उसका राज खुलता है। वह अपने पहले पति की तलाश में वहाँ जाती है। उसकी भारत व पाकिस्तान का विभाजन होने से पूर्व 'अनवर' नामक एक मुसलमान व्यक्ति के साथ उनकी शादी हुई थी। उसका विवाह दोनों परिवार के मान्यता से हुआ था। उसे अनवर से वच्चे भी हुए थे। उसकी तलाश में अम्मा पाकिस्तान आयी थी।

यहाँ पुलिस द्वारा उसे गिरफ्तार किया जाता है। उस समय वह अपनी वेटी को कहती है कि पीछे से भागते हुए आकर जोर से धक्का दे क्योंकि वह धक्का खाकर पीठ के वल गिरने का अभ्यास करती है। अंत मे गोली खाकर मर जाती है। तव वह मुँह के वल नहीं पीठ के वल पर ही गिरती है।

उपर्युक्त वातों से स्पष्ट होता है कि गीतांजलि श्री ने स्त्री जीवन की विवशता, विभाजन की त्रासदी, पारिवारिक जीवन, तृतीयपंथी जीवन, सामाजिक मूल्यों में परिवर्तन, संयुक्त परिवार की नोकझोक, देश के हालात, संवेदना और माननीय नियति का वास्तव चित्रण इस उपन्यास में किया है। इससे लेखिका गीतांजलि श्री का स्त्री के पीडा को व्यक्त करनेवाला यह उपन्यास है। इस वात को ध्यान में रखना होगा। स्त्री के प्रति गहरी संवेदना उनके साहित्य का केंद्रीय विषय रहा है। यह वात स्पष्ट हो जाती है।



# संतोष आनंद हिंदी भाषा के प्रचारक

**हिंदी** भाषा के प्रचार-प्रचार में महत्वपूर्ण भूमिका निभानेवाले प्रसिद्ध कवि और गीतकार संतोष आनंद जी के जीवन के, उनके राज सामने आए। तब यह सवाल खडा हो जाता है, कि हम तुरंत क्यों किसी भी बात से हार मान लेते है। उनकी जिंदगी दर्दभरी होते हुए भी उन्होंने दुनिया को नाम के समान 'संतोष' और 'आनंद' भी देने का कार्य किया है।

संतोष आनंद जी का जन्म ५ मार्च, १९४० को सिकंदराबाद में हुआ। जवानी में दुर्भाग्यवश एक पैर से विकलांग हुए थे। यह समस्या कम थी कि शादी के बाद काफी मन्नतों के बाद बेटा संकल्प पैदा हो गया । साथ ही एक बेटी शैलजा भी है। उनका बेटा गृहमंत्रालय में नौकरी करता था। उसने अपनी पत्नी के साथ आत्महत्या कर ली । यह बहुत बडी दुःखद घटना उनके बारे में घटित हुई।

इतना सबकुछ घटित होने के बाद भी जीवन के प्रति उनका सकारात्मक दृष्टिकोन सामने आता है। उन्होंने अपने करियर की शुरूआत 'पूरब और पश्चिम' फिल्म से की थी। वर्ष १९७२ में 'शोर' इस फिल्म के लिए '' एक प्यार का नगमा'' यह गीत लिखा था। इसे संगीत दिया लक्ष्मीकांत प्यारेलाल जी ने । वर्ष १९७४ मे फिल्म 'रोटी कपडा और मकान' के लिए '' मैं ना भूलूंगा'' के लिए उन्हे '' फिल्म फेयर पुरस्कार'' मिलर था । वर्ष १९८१ में 'क्रांति' फिल्म के लिए गीत लिखे। वह फिल्म उसी वर्ष सबसे ज्यादा कमाई करनेवाली फिल्म थी। उसी वर्ष फिल्म '' प्यासा सावन के लिए'' गीत लिखे '' तेरा साथ है तो'' और '' मेघा रे मेघा'' लिखे थे। उसके बाद फिल्म फेयर'' पुरस्कार से दूसरी बार सम्मानित किया गया । उन्होंने २६ फिल्मों में १०९ गाने लिखे है।

इस प्रकार संतोष आनंद जी ने अपने व्यक्तिगत जीवन की पीडा भूलकर दुनिया को आनंद देने का प्रयास किया है। ऐसे महान कलाकार ने इतना सबकुछ हासिल करने के बाद भी वे जमीन से जुडे रहे हैं। यह बडे लोग गुनगुनाते हुए नजर आते है। यह हिंदी भाषा के लिए गौरव की बात है। आज इनके गीतों के माध्यम से हिंदी भाषा की अच्छी सेवा करने का प्रयास संतोष आनंद जी ने किया है। आज हिंदी भाषा के प्रचार-प्रसार में हिंदी फिल्म जगत और गीतों की भूमिका महत्वपूर्ण रही है। इस कार्य में संतोष आनंद जी भी अपना सहयोग देते हुए नजर आते है।

आज तक हिंदी भाषा के प्रचार-प्रसार में अनेक संस्थाओं ने अहंम भूमिका निभायी थी। साथ ही समाचार पत्र, पत्रिकाएँ, आकाशवाणी और दूरदर्शन की भूमिका सराहनीय है। उसी प्रकार संतोष आनंद जी के गीतों ने भी हिंदी भाषा के लिए सेवा देने का कार्य किया है। उनका यह कार्य हिंदी भाषा और भाषा प्रेमियों की दृष्टी से निश्चित ही प्रेरणादायी रहा है। ऐसे महान महानुभावों के प्रति हिंदी जगत हमेशा ही ऋणी रहेगा।







Tally ERP-9 आणि Office Automation Course उद्घाटन प्रसंगी ऑनलाईन मार्गदर्शन करताना मा. सुरज राऊत व मा. राहुल कोळी



वाणिज्य क्षेत्रातील संधी व आव्हाने या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करताना प्रा.व्ही.एच. अवघडे, प्रा. डॉ. सौ. डी. एन्. राठोड व प्रा. डॉ. सौ. जे.जे. किरवे



बी. कॉम. भाग-१ मधील विद्यार्थीनींचे स्वागत करताना मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे, प्रा. शैला माने प्रा. शिवानंद भंडारी, प्रा. विक्रम काटे



बी. कॉम भाग-१ मधील विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे



Ozone Depletion when chlorine and bromine atoms come into contact with ozone in the stratosphere. They destroy ozone molecules. One chlorine atom can destroy over 100, 00 ozone can be destroyed more quickly than it is naturally created. Sep. 24, 2018.

*** How can we prevent depletion of ozone layer**

Buy air - conditioning and refrigeration equipment that do not use HCFCs as refrigerant. By aerosol products that do not use HCFCs or CFCs as propellants conduct regular inspection and maintenance of air conditioning and refrigeration appliances to prevent and minimize refrigerant leakage.

*** Where is the ozone hole ?**

**Antarctic**

What is the ozone hole? The ozone hole is not technically a "hole" where no ozone is present but is actually a region of exceptionally depleted ozone in the stratosphere over the Antarctic that happens at the beginning of southern. Hemisphere spring ( August - October) oct. 18, 2018.

*** Why is the ozone hole in Australia ?**

Firstly the ozone layer in the mid-latitude ( E.g over Australia) is thinned, leading to more UV radiation reaching the earth. Data collected in the upper atmosphere have shown that there has been a general thinning of the ozone layer over most of the globe.

*** Can we rebuild the ozone layer ?**

The Earth's protective ozone layer is starting to repair itself. According to a panel of united Nations Scientists. The main reason behind its recovery. They say, is the fact that certain chemicals, such as those used in aerosol cans, were phased out in the 1980s.

*****



# ।। महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ।।

कु. मयुरी पवार (बी.ए.-II)

जन्म : २३ एप्रिल १८७३ कर्नाटक (जमखिंडी)

बालपण :- जमखिंडी

मृत्यु :- २ जानेवारी १९४४ (मधुमेह आजाराने)

विठ्ठल रानजी शिंदे म्हणजे मानवी मुल्यांची जोपासना करण्यासाठी अविरत प्रयत्न करणारे त्यागाचे व निष्ठेचे प्रतिक, आज्ञानाच्या पुजेविरुध्द वैचारिक दंड पुकारुन जुन्या धार्मिक अनिष्ट परंपरेचे जोखड फेकुन देणारे ते सुधारक होते त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वांसाठी माणसातला माणूस जागा केला मानवाने मानवावर समभावाने प्रेम करावे तसा आचार सर्वत्र घडावा म्हणून आपले जीवन समर्पित करणारे ते एक कर्मयोगी होते. विद्वत्ता, संयम व सेवावृत्ती या महान आदर्शांचे महामानव म्हणजे कर्मवीर शिंदे होत. एक समाजसुधारक, अस्पृश्यता निवारणाचे खंदे पुरस्कर्ते, निरनिराळ्या धर्मातील तत्वांचे धर्मातील तत्वांचे संशोधक आणि ध्येयवादी विद्वान म्हणून त्यांना ओळखले जाते.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे याचा जन्म कर्नाटकातील जमखिंडी येथे इ.स.१८७३ साली झाला त्याचे घराणे हे सुरापुरचे जहागिरदार होते. ते घराणे मुळचे सधन व सुखवस्तु होते परंतु वडिलांचे संसारात लक्ष नसल्यामुळे 'बडा घर पोकळ वासा' अशा स्वरुपाची परिस्थिती निर्माण झाली होती त्यांच्या मातेचे नाव यमुनाबाई व वडिलांचे नाव रामजी असे होते या दांपत्याला २० मुले झाली. परंतु त्यातील पाचच जगली. विठ्ठलाचे पाळण्यातील नाव तुकाराम असे होते त्यांचे वडील 'भागवत' धर्माचे, वारकरी पंथाचे अनुयायी होते. ते विठ्ठलाचे परमभक्त होते त्यामुळे त्यांनी तुकारामाचे नाव विठ्ठल असे ठेवले. घरातील धार्मिक वातावरणामुळे त्यांच्या ठायी सहनशील व सहिष्णूवृत्ती, समभाव व समदृष्टी वाणली होती.

कर्मवीर शिंदे यांना सहाव्या वर्षी खासगी शाळेत घालण्यात आले. ते हुशार व चुणचुणीत होते. त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेला गुणग्राहक शिक्षकांची साथ मिळाली. इ.स.१८९१ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. शिक्षणक्रम चालु असतातच ६९ व्या वर्षी त्यांचा विवाह त्यांची आते बहिण रुक्मिणी हिचे बरोबर झाला.

मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांनी जमखिंडीच्या हायस्कुलमध्ये शिक्षकाची नोकरी पत्करली. त्याच दरम्यान त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली जमखिंडीच्या श्रीमंत सरकारांनी त्यांना मुंबईला व्हेटरनरी कॉलेजात जाण्यासाठी शिष्यवृत्ती देऊ केली. कर्मवीरांना गुरांचे डॉक्टर व्हावयाचे नव्हते, तर त्यांना मानवतेचे डॉक्टर व्हावयाचे होते. त्यामुळेच त्यांनी ज्ञानाचे माहेरघर असलेल्या पुण्यात इ.स. १८९३ मध्ये प्रवेश केला आर्थिक अडचण तर होतीच, त्याचबरोबर इतरही अडचणींना त्यांना तेथे सामोरे जावे लागले. पुण्यातील शिक्षणक्रमात त्यांना मराठा एज्युकेशन सोसायटीचे व बडोदयाचे सयाजीराव गायकवाड महाराजांचे सहाय्य मिळाले तसेच त्यांना शिष्य वृत्त्याही मिळाल्या. त्यांनी फर्ग्युसन महाविद्यालयातून स्वप्रयत्नाने बी.ए. ची पदवी मिळविली.

शिक्षणक्रम चालु असतानाच काही वयोवृद्ध व ज्ञानवृध्द मंडळींच्या सहवास त्यांना लाभला तसेच ते प्रार्थना समाजाचे सभासद झाले त्यांनी धार्मिक ग्रंथाचा अभ्यास केला. खऱ्या अर्थाने धार्मिक तत्वज्ञानाचे ज्ञान व्हावे व अनेकविध लोकांचा छळवाद मांडण्याचा धर्माला काय अधिकार आहे याची जाणिव करून घेण्यासाठीच त्यांनी धर्मग्रंथाचा अभ्यास केला मार्क्स, म्युलर, आगरकर आपटे, रानडे, भांडारकर इत्यादींच्या लेखनाचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला होता. त्यामुळेच त्यांच्या मनात सुधारणेविषयी प्रेम व आस्था निर्माण झाली.

प्रार्थना व ब्राम्होसमाजाच्या कार्याबरोबरच त्यांनी अस्पृश्यतेच्या उच्चाटनाचे कार्यही हाती घेतले त्यांना सर्व हिंदुस्थानचा प्रवास केला होता. त्यांनी भारतीय समाज समजावून घेतला शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे ही त्यांनी लक्ष दिले मात्र त्यांचे खरे कार्य सामाजिक व धार्मिक क्षेत्रातच एकवटले होते. पददलितांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले आयुष्य खर्च केले अशा या थोर समाजसेवकाचा मृत्यु १९४४ मध्ये झाला.

※ प्रार्थना समाजासाठी कार्यः-

परदेशात परत आल्यानंतर मोठया पगाराच्या नोकरीसाठी प्रयत्न न करता त्यांनी प्रथम प्रार्थना समाजाच्या प्रचारकाचे कार्य करण्याचे मान्य केले. ब्राम्हो व प्रार्थना समाजाच्या प्रचारासाठी अविरत मेहनत घेतली अखिल भारतीय एकेश्वरी परिषदांच्या अधिवेशनाचे ते कार्यकारी चिटणीस होते. त्यांनी जगातील सर्व उदार व सहिष्णुधर्मसुधारक चळवळींची माहिती सांगणारा इतिहास इंग्रजीत 'थिईस्टिक डेरिक्टरी' या नावाने संग्रहीत केली. टपालमार्फत तरूणांचे वर्ग चालवून व्याख्याने, उपदेश, लेख दौरे, कौटुंबिक उपासना याद्वारे त्यांना धर्मप्रचार केला प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून त्यांनी सातारा जिल्हयातील फार मोलाचे कार्य केले. त्यांनी धर्मप्रचारकाची भूमिका न स्वीकारता मानवताधर्माच्या समतावादी प्रचारकाची भूमिका बजावली. १९१० पर्यंत त्यांनी प्रार्थना समाजाच्या प्रचारकाचे कार्य केले मात्र ब्राम्होसमाजाच्या प्रचाराचे कार्य चालूच ठेवले. ते पुढे ब्रम्हदेशात प्रचारासाठी गेले.

※ अस्पृश्योद्धराचे कार्य :-

अज्ञान, दास्य, लाचारी, जातिभेद, जातिद्वेष व जातिमत्सर यांमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता दुर व्हावी म्हणून कर्मवीर शिंदे यांनी प्रयत्न केले समाजात समभाव प्रस्थापित होण्यासाठी समाजप्रबोधन केले. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी अपार हालअपेष्टा सहन केल्या. महात्मा फुल्यांनी अस्पृश्यता निवारणाची ज्योत इ.स. १८५१ साली पुण्यात प्रज्वलित केली आणि तीच ज्योत कर्मवीर शिंदे यांनी प्रकाशमान केली. प्रार्थना व ब्राम्हो समाजाचा प्रचार करण्यासाठी त्यांना हिंदुस्थानचा प्रवास करण्याची संधी मिळाली फिरत असताना त्यांना अस्पृश्य समाजाची दयनीयता पहावयास मिळाली ती पाहुन त्यांचे अंतःकरण पिळवटून निघाले. अस्पृश्य वर्गाला स्पृश्य वर्गाकडून अत्यंत वाईट वागणुक दिली होती. त्यांना दैन्याचे, अज्ञानाचे व अपमानाचे जीवन जगावे लागत होते. अस्पृश्यतेबावत ते लिहीतात, '' अस्पृश्यता ही पुरातन सामाजिक संस्था आहे तिचा व्याप सर्व जगात भरून राहिला आहे. मात्र भारतातील अस्पृश्यतेचे एक खास वैशिष्ट्ये आहे. जे इतरत्र कुठेही आढळणार नाही विवक्षित जाती वंशपरंपरेने अस्पृश्य मानणे, त्या जाती तशा अस्पृश्य रहाव्यात म्हणून त्यांना अगदी गावाबाहेर, पण फार दुर नाही. अशा निराळ्या वस्तीत डांबणे व जर कोणी स्पृश्यांनी किंवा अस्पृश्यांनी हा बहिष्काराचा नियम मोडला, तर त्या दोघांवरही प्रचलित राजकीय, धार्मिक कायदयाची अंमलबजावणी करणे ही भारतीय अस्पृश्यतेची खास वैशिष्ट्ये आहेत म्हणजे ही अस्पृश्यता केवळ स्थानिक अथवा धार्मिक नसून ती जातीय आणि नित्य स्वरूपाची आहे'' हे जर असेच चालू राहिले तर अस्पृश्य वर्ग ख्रिश्चन वा मुस्लिम धर्माकडे जातील आणि त्या धर्मात गेल्यानंतर ते हिंदु धर्माचे कडवे शत्रु बनतील. ती एक कायमची डोकेदुखी होईल वरील सर्वामुळे त्यांनी अस्पृश्य उद्धरासाठीच कार्य करण्याचे निश्चित केले अहमदनगरच्या भिगार गावी अस्पृश्यांच्या सभेला ते हजर राहिले त्या सभेत अस्पृश्य बांधवांनी आपल्यावरील अन्याय व हालअपेष्टा यांचे दर्दभरी निवेदन त्यांना दिले अशा अस्पृश्य वर्गाचे जीवन उन्नतावस्थेत आणण्याचा निश्चय त्यांनी केला अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी त्यांनी १८ ऑक्टोंबर १९०६ रोजी मुंबई येथे ' डिप्रेस्ड क्लासेस मिशन'(निराश्रित साहाय्यकारी मंडळी) ही संस्था स्थापन केली त्या संस्थेची उद्दीष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

१) अस्पृश्यांत शिक्षणाविषयी आस्था निर्माण करणे, त्यांच्यासाठी शाळा, उदयोग शाळा, दवाखाने, वसतिगृहे काढणे.

२) स्पृश्य समाजाचे परिवर्तन करणे, अस्पृश्य निवारणासाठी सर्व स्तरांतून पाठिंबा मिळवणे.

३) अस्पृश्यांना नोकऱ्या मिळवून देणे.

४) सार्वजनिक धर्माची शिकवण देणे.

५) अस्पृश्यांच्या सामाजिक अडचणीचे निवारण करणे.

अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सर्वच कुटुंब अत्यंत परिश्रमपूर्वक प्रयत्न करीत होते. त्यांच्या

मातोश्रीने अस्पृश्यांच्या मुलाचे संगोपनाचे कार्य केले. जुन्या कपडयांपासून पोलकी, अंगडी, परकर इ. बनविण्याचे कार्य केले वडील हिशेब लिहीण्याचे कार्य करीत. बहिण जानाक्का दलितांची शुश्रुषा करी. या संस्थेमार्फत ठिकठिकाणी शाळा, दवाखाने, वसतिगृहे, काढली प्रबोधनासाठी व्याख्याने, कीर्तने सुरू केली. पुणे, मुंबई, हुबळी, सातारा, ठाणे, मद्रास, अकोला, अमरावती, कोल्हापूर इ. ठिकाणी या मिशनमार्फत शाळा काढल्या गेल्या राष्ट्रीय सभेने अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला महत्व दयावे म्हणून कर्मवीर शिंदे यांनी फार प्रयत्न केले. त्यांनी ठिकठिकाणी अस्पृश्यांच्या परिषदा भरविल्या इ.स. १९१७ मध्ये ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सभेचे अधिवेशन कलकत्याला भरले या अधिवेशनात शिंदे यांच्या प्रयत्नामुळेच एक मुखाने अस्पृश्यता निवारणाचा ठराव मंजूर केला अस्पृश्यांवरील सर्व धार्मिक निर्बंध रद्द करावेत, माणुसकीचे सर्व हक्क त्यांना दयावेत उदयोग धंदयात त्यांना समान स्थळ दयावे असे सूचित केले त्यांच्या प्रयत्नांचीच अस्पृश्यतानिवारणाचा कार्यक्रम अखिल भारतीय पातळीवर जाऊन पोहोचला.

* शेतकरी परिषदा :-

कर्मवीर शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात सखोल विचार करून कार्य केले. इंग्रजी अमदानीत शेतकऱ्यांची दिवसेंदिवस बिकट परिस्थिती होत चालली होती.सरकार शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देत नव्हते सावकार व सरकारी नोकर यांच्याकडून त्यांची अडवणुक होत होती. तो कर्जाच्या खोल खड्डयात जात होता. अंधश्रद्धा, दारिद्रय व अज्ञान यांमुळे त्यांनी स्थिती अत्यंत शोचनीय झाली आहे.

अशा अवस्थेतील शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी त्याला संघटित करणे आणि त्यांना जागृत करण्याचे कार्य कर्मवीर शिंदे यांनी केले या संदर्भात त्यांनी पुणे येथे १९२८ मध्ये एक शेतकरी परिषद भरविली कष्टाळु शेतकऱ्यांची स्थिती सुधारली नाही तर सत्याग्रह करावा लागेल असा इशाराही त्यांनी दिला. मुंबई, तेरदळ, वोरगांव, चांदवड, या ठिकाणी त्यांनी परिषदा भरविल्या त्याद्वारे. शेतकऱ्यांमध्ये हक्काची, कर्तव्याची एक जुटीची जाणीव करून देण्याचे कार्य त्यांनी केले.

* इतर सुधारणा व कार्य :-

महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत ते सक्रीय सहभागी झाले या सत्याग्रहाला खेडयापाडयांतून जास्तीतजास्त प्रतिसाद मिळावा म्हणून शिंदे यांनी खेडोपाडी प्रचार केला. परिणामी सरकारने त्यांना अटक केली मदयपान, देवदासी पद्धत, शिमग्याच्या सणातील बीभत्स प्रकार यांना आळा घालण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले भाषणे, खेळाचे सामने आयोजित करून त्यांनी संस्कृती संवर्धनाचे कार्य केले. संकुचित धर्मसंकल्पना व जुन्या दुष्ट रुढी यांवर त्यांनी कठोर टीका केली हिंदु समाजातील देवदासी, मुरळी या अनिष्ट रूढींचा नायनाट करण्यासाठी त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले रावजी भोसले यांच्या साहाय्याने पंढरपुरात अनाथाश्रम उघडला. मानवी उन्नतीच्या उत्कर्षाला पोषक असणाऱ्या सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केलासनातनी लोकांनी त्यांच्यावर कठोर टिका केली मात्र ते आपल्या कार्यापासून ढळले नाहीत.

* साहित्य व संशोधन कार्य :-

कर्मवीर शिंदे यांची निरीक्षणशक्ती सुक्ष्म होती. पांडित्य सखोल व चिकित्सक होते 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा त्यांचा महत्वाचा ग्रंथ होय त्या काळातील भारतातील अस्पृश्यतेची कल्पना या ग्रंथावरून येते अस्पृश्यतेच्या प्रश्नांचाच त्यांनी मुलगा मी विचार त्यात मांडला आहे. त्यातून त्यांच्या संशोधक वृत्तीची जाण होते त्यांच्या चिंतनशील वैचारिक बैठकिची जाणीव येते त्यांच्या लेखनात व्यापक दृष्टी, मुलगामी, अवलोकन, समतोल मुल्यमापन, समप्रमाण विवेचन, विचारांचे गांभिर्य, भावनांचे उत्कटत्व यांचे दर्शन होते त्यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' हे आत्मचरित्र लिहीले आहे. ते अहंकाराचा स्पर्श नसलेले चरित्र आहे. ते एका सात्विक पुरूषाचे विनम्र निवेदन आहे. याशिवाय त्यांच्या लेखांचा संग्रह ग.ल. ठोकळ यांनी शिंदे लेखनसंग्रह' म्हणून प्रकाशित केला आहे. अधात्म, भाषाशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास संशोधन, सुधारणा इत्यादींवावत त्यांनी ते लिखाण केले आहे. त्यातून त्यांतील तत्वचिंतकाची भूमिका स्पष्ट होते.

कर्मवीर शिंदे यांच्या मते, सामाजिक सुधारणा असो वा राजकीय सुधारणा म्हणजे वर्गविहीन एकेश्वरवादी समाजाची निर्मिती करावयाची. त्याचे साधन सार्वत्रिक व समान शिक्षण. हे शिक्षण सर्वांना जसे सारखेच मिळाले पाहिजे तसेच ते धर्मापासून वेगळेही असू नये अशी कर्मवीर शिंदे यांची धारणा होती त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य सतत मेणवत्तीसारखे झिजविले. आयुष्यभर दारिद्रय व हालअपेष्टा सहन करून त्यांनी समाजसुधारणेचे कार्य केले अस्पृश्यता हा भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. तो धुवून काढण्यासाठी कर्मवीर शिंदे झगडले. त्यांचा महर्षी म्हणूनही गौरव केला गेला आहे, कोणत्याही फळाची अपेक्षा न करता अंगीकृत कार्य अखेरपर्यंत चालविणारे ते खरे 'निष्कर्ष कर्मयोगी' होते.

*****





# वाणिज्य
## विभाग

Don't educate your Children to be Rich.
Educate them to be Happy.
So when they grow up they
will know the value of things not the price.

विभागीय संपादक
प्रा. विक्रम काटे

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १) राजेंद्र पवार प्रयोगशील शेतीतज्ञ | कु. कुंभार श्वेता सुहास एफ.वाय.बीकॉम | ४५ |
| २) मुंबईचा डबेवाला व्यवस्थापन कार्यप्रणाली | कु. कोळपे स्नेहल प्रकाश | ४६ |
| ३) घरपोच पार्सल सेवा स्वयंरोजगाराची एक नवीन संधी | कु. मोरे पुजा सुरेश | ४८ |






## राजेंद्र पवार प्रयोगशील शेतीतज्ञ

कु. कुंभार श्वेता सुहास एफ. वाय. बीकॉम

**नमस्कार** मी कुंभार श्वेता सुहास सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रज येथे या वर्गात शिकत आहे दैनंदिन शिक्षणावरोवर महाविद्यालयामार्फत विविध, उपक्रम रावबले जातात. याच उपक्रमाच्या अंतर्गत मी प्रयोगशील शेतीतज्ञ राजेंद्र दादा पवार या विषयावद्दल माझे मत व्यक्त करीत आहे.

माननीय श्री. राजेंद्र पवार यांच्या बद्दल सांगायच म्हटलं तर खूप काही आपण सांगू शकतो राजेंद्र पवार यांना लहानपणापासूनच शेतीमध्ये काम करण्याची आवड होती त्यांनी शेतीसंदर्भात स्वतःचे शिक्षण भारतामध्ये आणि अमेरिकेमध्ये पूर्ण केले अमेरिकेमधील चांगल्या दर्जाची शेतीची पाहणी केल्यानंतर राजेंद्र पवार यांच्या मनात जागतिक पातळीवरील प्रयोगशील शेती आपल्या देशात करण्याचा विचार आला. १९७८ ते १९८२ पर्यंत अमेरिकेतील विद्यापीठ व शेतीत काम करून मिळालेला अनुभव घेऊन ते भारतात परतले इजरायल, इजिप्त, दक्षिण भारत, उत्तर भारत व इतर काही भागामध्ये शेतकरी ट्रीप घेऊन गेले. त्यामार्फत प्रगतशील शेतीची माहिती शेतकऱ्यांना दिली. अनेक शेतकरी या ट्रीप मार्फत शेतीची पाहणी व माहिती घेतात पण काहीजण यामध्ये यशस्वी होतात. कारण शेतीमध्ये काहीजणांना आवड असते असे त्यांचे म्हणणे होते. अशा शेतकरी ट्रीप मार्फत अनेक शेतकरी यशस्वी झालेले आहेत.

बारामती ॲग्रो आणि कृषी विज्ञान केंद्रामध्ये राजेंद्र पवार चेअरमन म्हणून कार्य पाहत आहेत. यामार्फत विविध कार्य केली जातात. या संस्थांचे ध्येय शेती, शेतकरी व कुटुंब या त्रिसुत्रावर चालत आहे. या संस्थामार्फत शेतकऱ्याचे अभ्यासदौरे आयोजित करण्यात येतात. अभ्यास दौऱ्यासाठी ॲग्रो टुरियम केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यामार्फत विविध बाबींचे शेतकऱ्यांना व महिलांना प्रशिक्षण देण्यात येते यामध्ये फळप्रक्रिया बचत गट, महिला सशक्तिकर, बियाणे निर्मिती, शेततळे सोयत मत्स्यपालन, शेतातील कचऱ्याचे ज्वलन न करता खतनिर्मिती, पॉली हाऊस, रेशीम उद्योग, मुक्त संचार गोटा, कुक्कुटपालन व शेळीपालन यासंदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहेत.

भीमथडी जत्रा मार्फत कृषी प्रदर्शन भरवण्यात येते. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली जाते. असे अनेक कार्य राजेंद्र पवार व त्यांच्या संस्थेमार्फत करण्यात आले आहेत. आपली मते शेतकऱ्यांसमोर मांडताना ते म्हणतात.

शेतीमध्ये रोज काहीतरी नवीन पाहायला मिळते. नवनवीन गोष्टी करायला मिळतात. जो शेतकरी कष्ट करतो, शेतीवर प्रेम करतो आणि मनापासून शेती करतो. तोच शेतीमध्ये यशस्वी होऊ शकतो. नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी स्वीकारलं पाहिजे. शेतकरी शेतीचे ज्यावेळी वेगवेगळे प्रयोग बघतो. त्यावेळी तो त्या प्रयोगावर विश्वास ठेवतो.

शेतीमध्ये काम करत असताना शेतीचे पूर्वज्ञान असणे गरजेचे आहे. स्वतः जमिनीमध्ये कष्ट घेतले पाहिजेत. त्यामुळे मजुरीचा खर्च वाचतो. जिवंत जमिनीशी खेळायचं असेल तर मायक्रोबायोलॉजी, बॉटनी व केमिस्ट्री याचे ज्ञान असले पाहिजे. या पिकाकडे फक्त साखरेचा उत्पादक म्हणून न पाहता इथेनॉल निर्मिती व इतर निर्मिती करणारा घटक म्हणून पाहिले पाहिजे. योग्य दृष्टिकोन ठेवून शेतीमध्ये नफा आपण कमवू शकतो. माननीय श्री राजेंद्र पवार यांच्या या कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र राज्याच्या कृषीविभागामार्फत कृषीक्षेत्रासाठी १९३० ते १९६० च्या काळात कृषितला ऋषी असलेले डॉ. पंजाबराव देशमुख हा कृषीरत्न पुरस्कार २०१९ हा देण्यात आला.

राजेंद्र पवारांकडे म्हणूनच प्रयोगशील शेतीतज्ञ म्हणून पाहिले जाते. त्यांचे शेतीमधील विविध चांगले प्रयोग आहेत. ते शेतकऱ्यांनी अवलंबले पाहिजेत व त्याचा वापर ही केला पाहिजे.

*****



# मुंबईचा डबेवाला

## व्यवस्थापन कार्यप्रणाली

कु. कोळपे स्नेहल प्रकाश

**नमस्कार,**

मी कु. कोळपे स्नेहल प्रकाश सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रज येथील बी.कॉम भाग-१ या वर्गामध्ये शिक्षण घेत आहे. महाविद्यालया मार्फत विविध उपक्रम रादविण्यात येतात. या मार्फत विद्यार्थिनींचे व्यावहारिक ज्ञान व व्यक्तिमत्व विकास घडविण्याचे कार्य केले जाते. त्रिवेणी मासिक या उपक्रमांतर्गत मी मुंबई डबेवाला यांचे व्यवस्थापन कार्यप्रणाली याबद्दल स्वतःचे मत तुमच्या समोर सादर करीत आहे.

मुंबई शहर हे विस्ताराने आवाढव्य असल्याने कामाच्या जागी वेळेवर लागते जर डबेवाल्यांची यंत्रणा अस्तित्वात नसली तर बहुसंख्य मंडळींना सकाळचा नाष्टा व दुपारच्या जेवणाचा डबा सकाळीच घेऊन निघावे लागले असते डबेवाल्यांच्या यंत्रणेमुळे बहुसंख्य गृहिणी गरम जेवण भरलेला डबा कार्यलयात पाठवू शकतात.

महादू हाजती बच्चे यांनी सन १८९० साली ३५ डबेवाल्यांसह ही सेवा सुरु केली आज पर्यंत मुंबई शहरामध्ये अनेक लोकांना दैनंदिन डबे पोहोचविण्याचे काम आहोरात्र चालू आहे. या मुंबई डबेवाला संघटनेमध्ये ५००० लोक काम करतात हे सर्वजण पुणे जिह्यातील मावळ तालुक्यातील आहेत. त्यांना कोणतेही व्यसन नाही. सर्व शाकाहारी आहेत. यांच्यामार्फत मुंबईमध्ये २०,००,००० डबे पोहोचवले जातात या संघटनेने आक्रमवती ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्याकडून घेतली आहे. तर नम्रता संतांकडून घेतली आहे. वारकी पंथाचा प्रभाव मुंबई डबेवालेवर दिसतो. बरेसचे डबेवाले कमी शिक्षित आहेत. कायम डोक्यावर टोपी असते डोक्यावर टोपी नसेत तर दंड आकारला जातो. तसेच डबे पोहोचवण्याचे काम हे सायकल व हातगाड्या मार्फत केले जाते यांची डबे पोहोचवण्याची अचकूक्ता ही ९९.९९% इतकी आहे. समजा, एखाद्या डबेवाल्याकडून पहिल्यांदा चूक झाली तर ती चुक डबेवाल्यांना सांगितली जाते व माफ केले जाते. तसेच दुसऱ्यांदा चूक झाल्यास त्यांच्याकडून दंड आकारला जातो. तिसऱ्यांदा चूक झाल्यास कामवरून काढले जाते. म्हणजेच या ठिकाणी योग्य शिस्तीचा वापर केला जात आहे. आणि याना कि योग्य नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे.



समजा एखाद्या घरांमधून ग्राहकाचा डबा त्यायच असेल तर तो डबा ग्राहकांच्या कुटुंबांकडून वेळेमध्ये मिळाला नाही तर तो डबा स्वीकारला जात नाही. म्हणजेच या ठिकाणी वेळेचे व्यवस्थापन दिसून येते. मुंबई डबेवाला अन्न पोहचवण्याचे काम हे व्यवस्थापन कौशल्यामार्फत करत आहे. ही व्यवस्थापन कार्यप्रणाली पुढील प्रमाणे पाहू या मुंबई डबेवाले हे सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत डबा ग्राहकांच्या कुटुंबाकडून होण्याच काम करतात. त्यानंतर तो डबा घेऊन १०.३० ते ११.२० ते १२.३० या वेळत रेल्वे मधील डबे उतरवले जातात आणि ते डबे डबेवाल्यामध्ये वाटले जातात. १२.३० ते १.०० या कालावधीत ग्राहकांना डबे पोहोचवले जातात. यानंतर १.१५ ते २.३० या वेळेत मोकळे डबे ग्राहकांकडून घेतले जातात. यानंतर २.४८ ते ३.३० यावेळेत पुन्हा ते डबे डबेवाल्यामध्ये वेगवेगळे केले जातात व शेवटी ३.३० ते ४.४० या कालावधीमध्ये ते डबे ग्राहकांच्या घरी पोहोच केले जातात. ही सर्व क्रिया वेळेचे नियोजन करून केले जाते. या कार्यामध्ये सर्व डब्यांवर विविध कोडचा नंबर चा वापर हा विविध रंगांमध्ये केला जातो. त्यानुसार मुंबई डबेवाले डबे वाटपाचं कार्य योग्य पध्दतीने पूर्ण करतात. याचा कार्याला व्यवस्थापन कार्यपणाली असे म्हटले आहे. या कार्यप्रणालीची वैशिष्ट म्हणजे १६ लाख मध्ये चूक होय. म्हणजेच या कार्यप्रणाली मध्ये चुकांचे प्रमाण कमी केले जाते. मुंबई डबेवाल्यांचा अजून एक वैशिष्ट सांगायचं म्हणजे संघटनेमार्फत रोटी बँक व कपडा बँक याची सुरुवात करण्यात आली आहे. या मार्फत शिल्लक राहिलेले अन्न गोळाकरून त्याचं गरीब लोकांमध्ये वापरलेले कपडे गोळा करून आदिवासी लोकांना त्यांचे मोफत वाटप केले जाते. म्हणजे सामाजिक भान हे संघटनेमार्फत राखले जात आहे.

तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान याची घोषणा जेव्हा केली. तेव्हा पंतप्रधान मोदींनी मुंबई डबेवाल्यांना दूत म्हणून स्वच्छ भारत अभियाना मध्ये समाविष्ट केले या घोषणा झाल्यानंतर ३० मिनिटांमध्यच स्वच्छता अभियान डबेवाले मार्फत राबविण्यात आले. म्हणजेच काम करण्याची तत्परता या ठिकाणी दिसून येते.

मुंबई डबेवाला संघटनेमध्ये कधीही कर्मचाऱ्यांचा संप झालेला नाही. यावरूनच कर्मचाऱ्यांना संघटनेमध्ये योग्य स्थान देण्यात आले आहे असं दिसून येतं. तसेच योग्यप्रेरणा सुध्दा दिली जात आहे हे या ठिकाणी समजत आहे.

अशा प्रकारे मुंबई डबेवाले हे व्यवस्थापण कार्यप्रणाली व इतर व्यवस्थापन कौशल्यांचा वापर करून आपले कार्य पूर्ण करतात. म्हणूनच या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर होण्यात आलेली आहे. अशाप्रकारे आपण आपल्या कामात व व्यवसायात विविध व्यवस्थापन खाद्य प्रणालींचा वापर करून यश संपादन करू शकतो.

*****

# घरपोच पार्सल सेवा स्वयंरोजगाराची एक नवीन संधी

कु. मोरे पुजा सुरेश




नमस्कार,

मी मोरे पुजा सुरेश सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रज येथील बी. कॉम भाग-१ या वर्गामध्ये शिकत आहे. महाविद्यालयामध्ये दैनंदिन शिक्षणाबरोबरच व्यावहारिक शिक्षण देण्याचे काम अत्यंत चांगल्या प्रकारे केले जाते. आम्हाला महाविद्यालयामार्फत चांगले ऑनलाईन शिक्षण दिले जात आहे. परंतु त्याचबरोबर व्यक्तिमत्व विकास घडावा यासाठी सुध्दा विविध उपक्रम




राबवले जातात. याच उपक्रमाच्या अंतर्गत मी तुम्हा सर्वासमोर घरपोच पार्सल सेवा स्वयंरोजगाराची एक नवीन संधी या विषयाबद्दल माझे सविस्तर मत व्यक्त करीत आहे.

आलिया भोगासी असावे सादर या म्हणोप्रमाणे २०२० पासून आतापर्यंत संपूर्ण जगामध्ये कोरोना व्हायरस ने धुमाकूळ घातला आहे. अशा अत्यंत वाईट परिस्थिती मध्ये अनेक लोकांचे व्यवसाय बंद पडले आहेत. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. तसेच काहीना दोन वेळचे जेवण सुध्दा मिळत नाही. अनेक आरोग्य तज्ञांचे विचार व मत ऐकल्यानंतर असे वाटत आहे की पुढील आयुष्य हे कोरोनाव्हायरस व इतर वायरसच्या धोक्यामध्ये राहून जगावे लागेल. आताच्या वाईट परिस्थिती वर मात करून आपल्या ला पुढे जावे लागेल. अनेक नवनवीन संधी उपलब्ध आहेत. त्याचा पण विचार करून त्याप्रमाणे वाटचाल केली पाहिजे. नवनवीन संधी शोधल्या पाहिजेत.

आताच्या घडीला कोरोना व्हायरस सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये धुमाकूळ घालत आहे आणि या कोरोना व्हायरस पासून लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी सरकार मार्फत संपूर्ण राज्यामध्ये लॉकडाऊन लावण्यात आलेला आहे. अशावेळी संचारबंदी व जमाव बंदी असे अनेक निर्बंध



लावण्यात आले आहेत. अशावेळी अनेक लोकांना जीवनावश्यक वस्तू व सेवा मिळविणे अत्यंत कठीण झाले आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणूनच जीवनावश्यक वस्तू व सेवा आपण व्यक्ती पर्यंत घरपोच पोहचविणे अत्यंत गरजेचे बनलेले आहे. आणि ती काळाची गरज सुध्दा आहे. व्यवसाय करण्यासाठी व ग्राहकांची गरज पूर्ण करण्यासाठी घरपोच वस्तुंची व सेवांची पार्सल सेवा हा व्यवसाय अत्यंत महत्वाचा दुवा बनला आहे. या व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणामध्ये भांडवलाची गरज नसते. आज प्रत्येक व्यक्तीकडे दोन चाकी गाडी आहे. याच साधनाचा वापर करून जीवनावश्यक वस्तू व इतर वस्तू आणि सेवा या ग्राहकांपर्यंत पोहोचवता येतात.

आता आपण विचार करायच म्हटल तर धान्य किराणामाल, भाजीपाला, खाद्यपदार्थ, जेवणाचे डबे व इतर काही महत्त्वाच्या सेवा आपण या व्यवसायामार्फत ग्राहकांपर्यंत पोहोचवू शकते यासाठी वस्तूची उपलब्धता करणे त्याचा पुरवठा करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. घाऊक व्यापाऱ्याकडून धान्य व किराणामाल कमी दरामध्ये खरेदी करून त्याचा ग्राहकाच्या मागणीनुसार पुरवठा घरपोच करू शकतो. तसेच भाजीपाला थेट शेतकऱ्याकडून कमी दरात विकत घेऊन त्याचा सुध्दा ग्राहकाच्या मागणीनुसार घरपोच पुरवठा करू शकतो यासाठी थोडीशी आर्थिक गुंवणूक करावी लागते. स्वतःकडे एक दुचाकी आणि वस्तूचे मोजमाप करण्याचे साहित्य व स्वतःला हिशोब ज्ञान असणं अत्यंत गरजेच आहे.

कोरोनाच्या काळात सर्व दुकाने, बाजारपेठा बंद असंल्याने व्यक्तींना वस्तूंचा पुरवठा होत नाही. वस्तूची दुकानातून व बाजारपेठेत जाऊन ग्राहकांना खरेदी करता येत नाही. त्यामुळे घरपोच पार्सल सेवा हा व्यवसाय अत्यंत चांगला पर्याय होऊ शकतो व या व्यवसायामध्ये आपण यश सुध्दा प्राप्त करू शकतो. हा व्यवसाय करत असताना आपण स्वतः किंवा कुटुंबातील इतर व्यक्तींना बरोबर घेऊन किंवा त्यांची मदत घेऊन हा व्यवसाय चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकतो व फायदा सुध्दा या ठिकाणी आपण कमवू शकतो. हि एक स्वयंरोजगाराची नवीन संधी आहे.

घरपोच पार्सल सेवा हा व्यवसाय करत असताना आपण ग्राहकांशी थेट संपर्क साधला पाहिजे. कारण ग्राहक हा रास्त दरामध्ये नाविन्यपूर्ण, दर्जेदार आणि प्रसिद्ध वस्तू घरपोच घेण्यासाठी उत्सुक आहे. कोरोनाच्या काळामध्ये शहरातील काही प्रमुख हॉटेल्सशी टायअप केले असून कुरीअर सेवेतील कर्मचाऱ्यांमार्फत हॉटेलच्या पार्सल ऑर्डस नागरिकांपर्यंत पोहोचवल्या जात आहेत. यातून कुरिअर सेवेतील कर्मचाऱ्यांना रोजगार मिळत असून अर्थचक्र पून्हा एकदा वाढत आहे. लॉकडाऊनमध्ये बरेच लोकांनी हा व्यवसाय चालू केला आहे. आणि या व्यवसाय मार्फत मोठ्या प्रमाणामध्ये नफा कमविल्या आहे. संकटावर मात करायची असेल तर संकटालाच आपला सारथी बनवून नवीन संधीचा शोध घेऊन त्याचा आपण लाभ घेतला पाहिजे. नुसता विचार करून चालत नाही. तर त्याच्यावर अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे. तरच आपण यश प्राप्त करू शकतो

धन्यवाद

*****



# अहवाल
विभाग

A good education
is a foundation
for better future.

- Elizabeth Warren

विभागीय संपादक
प्रा. सोमा कोरडे



# अंतरंग

* **Individual Report 2019 - 20** - पृष्ठ

* **विभागिय अहवाल**


1) Competitive Examination Guidance Centre
2) Spoken English Course
3) IQAC/RUSA Committee
4) UGC Committee
5) मराठी विभाग अहवाल
6) अविष्कार समिती
7) प्लेसमेंट सेल
8) हेल्थ सेंटर
9) शैक्षणिक सहल कमिटी
10) ॲकॅडमिक कॅलेंडर, टाईम टेबल व रोल कॉल कमिटी
11) शॉर्ट टर्म कोर्स कमिटी
12) रेमिडीयल कोर्स कमिटी
13) महिला लैंगिक छळ व तक्रार निवारण कमिटी
14) स्कॉलरशिप कमिटी

# Individual Report 2019-20

1. Member of College Development Committee in M.R. Jagtap Mahila Mahavidyalaya, Umbraj. (CDC for 2017 - 18 to 2021 -22)
2. Worked as a Co-ordinator of Short Term Courses in the M.R. Jagtap Mahila Mahavidyalaya, Umbraj.
3. Participated in 3 days International E-Conference on strategy and challenge in Higher education during covid-19 lockdown period in India with reference to the world, organized by government Vidarbh Institute of science and Humanities, Amravati.
4. Participate in Natinal level online Wildlife Photography Exhibition, organized by Shri Pundalic Maharaja Mahavidyalaya Nandura.
5. Participate in National level online Postar presentation competition.
6. Geography department was organized online Webinar on **Environmental Consciousness** on **10th July 2020.**
7. Organized online Programme on **Skill Based Short Term** Course on 18th October 2020.
8. Organized online programme on **Enviromental Awareness and Project Work** on 23/12/2020.
9. Organized One Day Workshop on **Environmental Awareness Today's** Need on 19/03/2021.
10. Organized Postar presentation competition, Elocution competition & Essay competition, on various Reformers.

**Mrs. Asha Budharam Madavi M.A. NET.**
**Department of Geography**

---

**Date : 06/06/2021**

१. अकॅडेमिक कॅलेंडर, टाइम टेवल व रोल कॉल कमिटी : शैक्षणिक वर्ष जून २०२० ते मे २०२१ पर्यंतचे अकॅडेमिक कॅलेंडर यांचे नियोजन मा. प्राचार्य डॉ. एस.एम कांवळे साहेव यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले. प्रत्येक महिन्यात कोणते काम असेल याचा आराखडा तयार करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व समितीचे कार्य यात मांडण्यात आले व अकॅडेमिक कॅलेंडर अनुसार ऑनलाईन कार्यवाही करण्यात आली. जून २०१९ ते एप्रिल २०२० पर्यंतचे टाईम टेवल तयार करण्यात आले. प्रत्येक विषय शिक्षकांच्या नावांसह कोणताही अडथळा न येता टाईम टेवल तयार करण्यात आले व ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले. विद्यार्थिनींचे प्रवेश झाले कि प्रत्येक वर्गाचे, विषयानुसार विद्यार्थिनींचे रोल कॉल तयार करण्यात आले. अकॅडेमिक कॅलेंडर, टाईम टेवल व रोल कॉल कमिटी तयार करण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले. मा. प्राचार्य डॉ. एस एम कांवळे साहेव यांनी नेहमीच मार्गदर्शन केले यावद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची आभारी आहे.

प्रा. आशा वुधराम मडावी
चेअरमन – अकॅडेमिक कॅलेंडर, टाईम टेवल व रोल कॉल कमिटी

---

**Date : 06/06/2021**

१. शॉर्ट टर्म कोर्सेस समिती : शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये करोना प्रादुर्भावामुळे शॉर्ट टर्म कोर्सेस प्रवेशासाठी मा. प्राचार्य डॉ. एस.एम कांवळे साहेव यांच्याशी चर्चा केल्या नंतर या समितीचे कार्य सुरु करण्यात आले. प्रवेश प्रक्रिया वरोवरच शॉर्ट टर्म कोर्सेस मधील एकूण १० कोर्सेसचे प्रवेश देखील केले जातात. विद्यार्थिनींच्या आवडी अनुसार त्यांना एक कोर्स घेण्याची परवानगी दिली जाते. महाविद्यालयात ऑफिस ऑटोमेशन, स्पोकेन इंग्लिश, वालवाडी शिक्षक शिक्षण प्रशिक्षण, पाक कला, ड्रेस मेकिंग, व्युटी केयर, कराटे प्रशिक्षण, प्राथमिक योगा, वोकसिंग, एम.पी.एस.सी पुर्व तयारी असे एकूण १० कोर्सेस आहेत. वी.ए.भाग १ साठी कराटे प्रशिक्षण आवश्यक कोर्स आहे. कोर्स शिक्षक विषयी चर्चा करण्यात आली व सुरळीतपणे ऑनलाईन कार्य सुरु झाले. गरजू व आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थितीत असणाऱ्या विद्यार्थिनींना प्राचार्य डॉ. एस.एम. कांवळे साहेव यांच्या परवानगीने सवलत देण्यात आली. हे सर्व कोर्सेस व्यवस्थितपणे ऑनलाईन चालावे यासाठी समितीची वैठक घेण्यात आली अशा प्रकारे या समितीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. एस.एम कांवळे साहेव यांनी नेहमीच मार्गदर्शन केले यावद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची व सर्व समिती सदस्यांची आभारी आहे.

प्रा. आशा वुधराम मडावी
समन्वयक – शॉर्ट टर्म कोर्सेस समिती



1. Conducted online lectures as per the guidelines of Shivaji University Kolhapur.
2. Jointly Organized National level webinar on 'Environment Consciousness' by IQAC, NSS and Dept. of Geography, dated, 10th July 2020.
3. Organized National level webinar on 'Covid-19' and Mental Health' by IQAC and Dept. of Psychology dated, 24th July 2020.
4. Online Lecture organizedan occasion of World Mental Health Day by Dept. of Psychology dated 20th October 2020.
5. Lecture delivered an occasion of "International Women Day" at Mahatma Gandhi Junior College, Umbraj 8th March 2021.
6. "Quality of Life" Work-Life balance and Occupational Stress among Male and Female Police Constables, Research paper published in International Journal of Humanities, Law and Social Sciences, Kanpur Philosopher's ISSN 2348-8301.

**Mrs. Patil Kalpana Narayan M.A. NET.**
**Department of Psychology**

---

I Completed the assigned work throughout the academic year 2020-2021. I successfully preformed my duty as the Head of Department conducted online lectures.

I worked with responsibility the following work.

1. IQAC Coordinator of the college unit. In the month of Feb the college is going to submit it's third AQAR.
2. Worked as CEO of the college. conducted online exam of B.A.III/B.A.II/B.AI of SEM III/V/I respectively along with backlog examinations.
3. Worked as chairman of UGC committee done the Correspondence with UGC office throughout the year.
4. Organized the one day workshop on importance and need of translation.
5. Worked as member of mock peer team of Sanstha.
6. Deliver lecture on NAAC how to face peer team at pusegaon college.
7. Organized various online programmers through IQAC committee.
8. Participated in international / national / state level seminars / workshops at various colleges.
9. Completed online refresher course.
10. Sent a affiliation proposal of B.com to shivaji university.
11. Worked as paper setter, Examiner senior supervisor at B.A.I, II and III internal Exam and university exam.
12. Organized national level seminar on 'New Education Policy-2020' in collaboration of Anantrao Thopate college, Bhor.
13. Worked as CDC member of the college.

**Prof. Manohar Malge.**
**Department of English**

---

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध कार्यक्रमातील सहभाग

१. उंब्रज ता. कराड जि. सातारा येथील म. गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा पंधरवडा संवर्धन व विकास ह्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले दि. २९ जाने. २०२१
२. यशवंतराव जाधव विद्यालय उंब्रज येथे दि. २९ जाने. २०२१ रोजी मराठी भाषा संवर्धन व विकास ह्या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
३. छ. शिवाजी कॉलेज सातारा येथे दि. १५ फेब्रु. २०२१ ते २८ फेब्रु. २०२१ ह्या कालावधीत रिफ्रेशर कोर्स पुर्ण केला आहे.
४. माझ्या अक्षर यात्रिक ह्या काव्य संग्रहास शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर यांनी २०२०-२१ चा शिवियं ललित साहित्य पुरस्कार देऊन गौर केला आहे.

प्रा. डॉ. उमाप ए. एस.
मराठी विभाग

# विभागीय अहवाल

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागात खालील कार्यक्रम राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेविकांनी कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मास्क शिवून मास्कचे वाटप केले. सोशल मिडीयाच्या माध्यमातून कोविड-१९विषयी जनजागृती केली. मौजे कळंत्रेवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेविकांनी मास्केचे वाटप केले. तसेच रांगोळीच्या माध्यमातून देखील कोविड-१९ विषयी जनजागृती केली. दि. २१ जून २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेविकांनी योगा फ्रॉम होम या कार्यक्रमात सहभाग घेवून घरून योगा प्रात्यक्षिके केली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार दक्षता जनजागृती सप्ताहात भ्रष्टाचार विरोधी शपथ घेण्यात आली. फिट इंडिया कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य व स्टाफ यांनी कोविड-१९ च्या सर्व नियमांचे पालन करून ३ किलोमीटर वॉकिंग केले. दि. १०/०७/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पर्यावरण जागीवजागृती या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले. त्यामध्ये श्रीमती संध्या चौगुले, मुख्याध्यापिका श्री सेवागिरी विद्यालय, पुसेगाव यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले. तसेच दि. ०२/१०/२०२० रोजी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधीचे जीवन व कार्य या विषयावर मा. किशोर रक्ताटे यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले.

वरील सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागातील समिती सदस्य यांचे मालाचे सहाकर्य व मार्गदर्शन लाभले.

प्रा. सौ. कल्पना पाटील
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## कमवा व शिका

कमवा व शिका या योजने अंतर्गत वर्षातून दोन मिटींग झाल्या आहेत व सर्व सभासदांच्या उपस्थितीत ठराव घेण्यात आले आहेत त्यामधील सर्वानुमते ठरवानुसार ज्या विद्यार्थिनीचा ऑफ तास असेल त्यांना कमवा व शिका या योजने अंतर्गत काम देण्याचे प्राचार्य व सभासद यांच्या ठरावानुसार काही विद्यार्थीनींना काम देण्याचे ठरवण्यात आले आहे. त्यानुसार अहवालात माहिती देण्यात येत आहे. खालीलप्रमाणे विद्यार्थीनी ग्रंथालयात विभागात घेण्यात आल्या होत्या ग्रंथालय विभागतून ह्या विद्यार्थीनींना दारोकार्डवर जादाची पुस्तके वाचण्यासाठी दिले जातात त्यानंतर इंटरनेट ही सेवा दिली जाते. तसेच त्यांना वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यांची नावे खालीलप्रमाणे देण्यात आली आहेत.

कु. आरजु मुल्ला बी.ए-२
कु. गौरी काळे बी.ए.-२
कु. सुनिता राठोड बी.ए.-१

प्रा. सौ. शोभा बाबासाहेब कोरडे

## IQAC Committee

The IQAC Committeee of the college is very active throughout the year. IQAC Committee is very aware to enhance the quality. The IQAC Committee done the work of monitoring of the versions curricular, co-curricular and extra curricular activities in the college. IQAC Committee organized various guidance lectures to the students.

**Prof. Manohar Malge. Co-ordinator IQAC**

## Examination Committee

Examination Committee of the college is in functions. As per the guidelines of university the online exams are conducted.

**Prof. Manohar Malge. Chairman of Examination**

## ग्रंथालय अहवाल

आज चे युग हे माहिती आणि तंत्रज्ञान यांचे आहे. आणि ह्या युगात माहितीचा साठा ज्या व्यक्तिकडे आहे. तोच श्रीमंत माणूस आहे हि आजची परिस्थिती आहे. आज आपण बघतो कि प्रचंड प्रमाणात नवीन माहितीचा उगम होत असताना दिसून येत आहे. आणि हि सर्व माहित आपल्याला पाहिजे असेल तर आपल्याला शेवटी माहिती केंद्र म्हणजे ग्रंथालय दिसून येते आणि ह्या ग्रंथालयापैकीच एक ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयीन हे एक माहिती केंद्र म्हणून कर्तव्य पार पाडत आहे. उंब्रज येथील सौ. मंगलताई रामचंद्र जगताप माहिला महाविद्यालय ग्रंथालय आहे. ह्या महाविद्यालयात शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थीनी ह्या खेडोपाडी तू येणाऱ्या आहेत. विद्यार्थिनीना ग्रंथालयातून वेगवेगळ्या सेवा दिल्या जातात. त्यापैकी फ्री इंटरनेट, प्रिंट, बुक-बँक, संदर्भसेवा, पुस्तक देवघेव सेवा, क्रमिक पुस्तके, करंट अवरनेस सेवा, न्यूज पेपर Question bank, Audio, Viedo, lecute, e-books e-journals, Whatsaap group वर माहिती पाठविणे इत्यादी सेवा दिल्या जातात. क्रमिक पुस्तकांची संख्या एकूण ३७९१/- संदर्भ पुस्तके ११९९९ नकाशे २६, सीडी ५६ क्यसेट १२ नियतकालिके २० Back Volume १७ न्यूज पेपर ९ इत्यादी माहिती साधने ग्रंथालयात उपलब्ध आहेतयाच बरोबर महान नेत्यांच्या जन्म दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन घेतले जाते त्यात डॉ. बी. आर आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. एस. आर. रंगनाथन, ए.पी.जे. अब्दुल कलाम इत्यादी वाचन संस्कृती या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले होते, तसेच भित्तीपत्रके Best reader award, Book abstract, Book reading Competitive इत्यादी स्पर्धा घेतल्या जातात.



## जिमखाना विभाग

शिक्षण प्रक्रियेत बैद्धिक विकासाबरोबरच शारिरीक संपदा सुध्दा अतिशय महत्वाची आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासासाठी जिमखाना विभाग हा महत्वाचा आहे.

सांघिक भावना, आज्ञापालन, सहकार्य, स्वार्थ त्याग, एकात्मिकता व साहस हे गुण विद्यार्थ्यामध्ये रूजविण्यासाठी शारिरीक शिक्षध व खेळ हे एक उत्तम माध्यम आहे.

महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन निमित्त २९ ऑगस्ट २०२० रोजी ऑनलाईन स्पोर्टस क्यूझ घेण्यात आली. ऑनलाईन पोलीस भरतीपूर्व व्याख्यान १९ ऑक्टोबर २०२० रोजी प्रमुख वक्ते सौ. धनश्री भगत-पाटील पोलिस उपनिरीक्षक सातारा शहर पोलीस स्टेशन सातारा. यांनी दिले. योग दिन निमित्त ऑनलाईन व्याख्यान २१ जुन २०२१ रोजी मानवी जीवनात योगाचे महत्व या विषयावर मा. डॉ. पल्लवी कव्हाणे संचालक, महाराष्ट्रीय मंडळ योग केंद्र, पुणे व आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक विजेत्या यांनी दिले. तसेच महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, कराटे वर्ग इत्यादी चालविले जातात.

महाविद्यालयातील विद्यार्थीनी कबड्डी, खो-खो, कराटे, बॉक्सिंग, बॅडमिंटन, अॅथलेटिक व्हॉलीबॉल इत्यादी क्रीडा प्रकाराचा सराव करताना.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे साहेब यांचे खेळाडूंना नेहमीच प्रोत्साहन असते. तसेच दत्तात्रय जाधव (आवा) यांचे माहविद्यालयास भरीव योगदान आहे. विविध उपक्रमावेळी जिमखाना कमिटी सर्व सदस्य तसेच प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांनी जिमखाना विभागस यशोचित सहकार्य केले सर्वाचे मन:पूर्वक आभार.

प्रा. डॉ. ढमाळ पी. यु. जिमखाना विभाग प्रमुख

## मराठी विभाग

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये आणि विभागांतर्गत विद्यार्थिनीच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

दि. २० सप्टेंबर २०२० रोजी प्रसिध्द साहित्यिक आणि जेष्ठ विचारवंत डॉ. वाबुराव गुरव यांचे अण्णाभाऊ साठी यांचा साहित्य प्रवास ह्या विषयावर ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान कार्यक्रम संपन्न झाले. सदर व्याख्यान कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. बाबुराव गुरव यांनी लोकशाहीर आणि साहीत्य सम्राट अण्णा भाऊ साठी यांचा साहित्य प्रवास तसेच त्यांचे जीवन कार्य अतिशय प्रभावीपणे व्याख्यानातून स्पष्ट केले.

दि. ५ सप्टें २०२० रोजी डॉ. राधाकृष्णन् सर्वपल्ली यांचा जन्म दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. श्रीरामपू जि. सर्वपल्ली जीवन आणि कार्य ह्या विषयावरती ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. सदर व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

दि. ३० जुलै २०२० रोजी ऑनलाईन पध्दतीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभागांतर्गत मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेच्या अनुवादाची गरज आणि महत्त्व ह्या विषयावरती संयुक्त वेबीनार संपन्न झाले. मराठी विभागांतर्गत श्रीरामपूर येथील जेष्ठ साहित्यिक कवी प्रा. डॉ. वाबुराव उपाध्ये यांचे अनुवादाचे महत्त्व ह्या व्याख्यान संपन्न झाले. सदर कार्यक्रमात प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी अध्यक्ष म्हणून विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

दि. २५ जाने २०२१ रोजी कला व वाणिज्य महाविद्यालय उंडाळे जि. सातारा येथील मराठी विषयाचे विभाग प्रमुख प्रा. प्रदिप चोपडे यांचे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे कार्य ह्या विषयावर व्याख्यान ऑनलाईन पध्दतीने संपन्न झाले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

दि. २७ फेब्रु. २०२१ रोजी मराठी विभागांतर्गत जेष्ठ साहित्यिक आणि कमी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म दिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला. उंब्रज येथील महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अनिल पोतदार यांनी प्राचार्य संजय कांबळे यांचे उपस्थितीत कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन अभिवान करण्यात आले. प्राचार्य अनिल पोतदार यांनी वि.वा. शिरवाडकर जीवन आणि साहित्य ह्या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय कांबळे हे होते.

अशा प्रकारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये मराठी विभागांतर्गत विविध कार्यक्रमांचे यशस्वीरित्या आयोजित करण्या आले होते. मराठी विभागाच्या विविध कार्यक्रमांस प्राचार्य डॉ. संजय कांबळे अनमोल मार्गदर्शन लाभले. तसेच मराठी विषयाच्या प्रा. सौ. शैला माने यांनी विशेष सहाकर्य केले.

प्रा.डॉ. उमाप ए.एस. मराठी विभाग

## Rayat Shikshan Sanstha's
## Sou. M.R. Jagtap Mahila Mahavidyalaya, Umbraj

### STAFF LIST

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Principle Dr. Sanjay Kambale | M.Com, NET, M.Phil Ph.D | |
| 2. | Prof. Dr. Machindra Sakte | M.A, Ph.D | Sociology |
| 3. | Prof. Suresh Salunkhe | M.A.M. Phil | History |
| 4. | Prof. Manohar Malge | M.A | English |
| 5. | Prof. Nilesh Phase | M.A. SET | English |
| 6. | Prof. Dr. Vandana Mohite | M.A. M.Phil, Ph.D | Hindi |
| 7. | Prof. Asha Madavi | M.A. NET. | Geography |
| 8. | Prof. Dr. Abasaheb Umap | M.A. NET, Ph.D | Marathi |
| 9. | Prof. Shobha Korade | M.A. M.Lib, NET | Librarian |
| 10. | Prof. Dr. Pankaj Dhumal | B.A. M. PEd, Ph.D | Phy. Director |
| 11. | Prof. Kalpana Patil | M.A., SET | Psychology |
| 12. | Prof. S.A Bhandari | M.A. M.Phil. SET Economics | Economics |
| 13. | Prof. Maruti Tambe | M.A. | History |
| 14. | Prof. Somnath Koli | M.A. B.Ed., M.Phil, NET Hindi | Hindi |
| 15. | Prof. Shaila Mane | M.A., SET | Marathi |
| 16. | Prof. Suraj Kakade | M.A. SET | Sociology |

### NON TEACHING STAFF

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Shri. Bharat Pawar | Sr. Clerk | M.A., B.Lib. |
| 2. | Shri. Rajendra Kamble | Lib. Attendant | 10th |
| 3. | Shri. Yuvraj Virkar | Lib. Attendant | 12th |
| 4. | Shri. Adhik Jadhav | Peon | 7th |
| 5. | Shri. Nita Mohite | Clerk | B.A. |







बी. कॉम. भाग-I मान्यतेसाठी डॉ. अरूण गाडे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर LIC कमिटीतील मा. चेअरमन आणि डॉ. डी. टी. चौरे यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य व स्टाफ



महाविद्यालय विकास समिती बैठकीप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे ऑडिटर मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे



महाविद्यालयातील जिम ची पाहणी करताना मा. संध्या चौगुले मॅडम मा. डॉ. सुधीर कुंभार मा. प्राचार्य, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पंकज ढमाळ व महाविद्यालयाचा स्टाफ




श्री. अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर जि. पुणे आणि रयत शिक्षण संस्थेचे सौ. एम. आर जगताप महिला महाविद्यालय उंब्रज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि सामाजिक न्याय या विषयावरील चर्चासत्रात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संजय कांबळे




रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

कराड जि. सातारा – ४१५१०९

Reaccredited at 'B' + 'grade (CGPA 2.66) by NAAC

# त्रिवेणी

## २०२०–२१

